
MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष पंधरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१४

## संपादकीय

## सांस्कृतिक सजगता

सांस्कृतिक बधिरता व्यक्ती आणि समाजाला संवेदनहीन बनविते, तर संवेदनशील समाज संस्कृतीच्या बाबतीत सजग असतो. असा सांस्कृतिक सजग समाज हा अभिरुची वृद्धिंगत करतो आणि सर्जनाला पोषक पार्श्वभूमी तयार करतो. संस्कृतिबधिर समाज सण, उत्सवांना विकृत स्वरूप देतो, तर अभिरुचिसमृद्धसमाज या सणांची गेयता वाढवून समाजाला तणावमुक्त करतो. आजच्या आपल्या सणांना आलेले विकृत स्वरूप, त्यातील बाजारीपण आणि थिल्लरपणा हा बहुतांशी आपणच स्वेच्छेने निवडून दिलेल्या राजकीय नेतृत्वामुळे आहे. त्यांची अरेरावी, उद्दामपणा, संस्कृती आणि पुरोगामित्वाचे दिवाळखोरीच्या वेशीवर उभे असलेले युक्तिवाद यांचा आता कंटाळाच नाही तर उबगही आला आहे. सांस्कृतिक सजगता जपणे आणि वाढवणे हेच या रोगाचे औषध आहे. याची अनेक उदाहरणे आपल्याला जगभर दिसतात.

हिंदू आणि बौद्ध संस्कृतीचा प्रभाव दक्षिण-पूर्व आशिया खंडातील देशांमध्ये मोठया प्रमाणावर दिसून येतो. अनेक अभ्यासकांच्या मते याची सुरुवात ख्रिस्तोत्तर काही शतकांमध्ये झाली असली, तरी त्याचा प्रभाव मात्र आठव्या-नवव्या शतकांतच विशेषकरून दिसून येतो. संस्कृत भाषेपासून कलेच्या सर्व अंगांवर हा प्रभाव दिसून येतो. म्हणूनच थायलंडमध्ये अयोध्या दिसते आणि इंडोनेशियाच्या विमान कंपनीचे नाव गरुड आहे. व्हिएतनाम आणि कंबोडिया हे असेच हिंदू-बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली असलेले दोन देश. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या दोन्ही देशांना साम्य आणि भांडवलवादाच्या सिद्धान्तवादांनी यादवी युद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. दुर्दैवाने हा सर्व प्रदेश शीतयुद्धाचा भाग बनल्यामुळे या देशांची प्रचंड सांस्कृतिक आणि वित्तहानी झाली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर मात्र हे दोन्ही देश पुन्हा एकदा आपल्या राष्ट्रबांधणीला लागले.

व्हिएतनाम ही फ्रेंचांची वसाहत होती. भारताप्रमाणेच व्हिएतनाममध्येही शेकड्यांनी संस्कृत शिलालेख फ्रेंच सरकारला आढळून आले. फ्रेंच संस्कृततज्ज्ञांनी त्यांचा अभ्यास सुरू करून त्यांना संग्रहालयामधून जपून ठेवले. अशा प्रकारे सुमारे शंभर संस्कृत कोरीव लेखांचे भाषांतर फ्रेंचमध्ये करून ते त्यांनी अभ्यासकांना उपलब्ध करून दिले आहे. तत्कालीन व्हिएतनामी समाजाच्या धार्मिक, आध्यात्मिक, वैज्ञानिक, सामाजिक सर्व जडणघडणीचे त्यामध्ये प्रतिबिंब दिसून येते.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आजही जगात यावर मोठ्या प्रमाणावर अभ्यास चालू आहे. आपल्या देशातील हस्तलिखिते आणि ताम्रपटांची आपण केलेली वाताहत बघता, व्हिएतनाममधील संस्कृत कोरीवलेखांची जपणूक हे फ्रेंच सांस्कृतिक सजगतेचे जिवंत उदाहरण आहे.

कंबोडिया हा व्हिएतनामचा शेजारी देश. दहाव्या शतकामध्ये ख्मेर राजांचे तेथे साम्राज्य होते. त्यांनी हिंदू धर्म आणि संस्कृतीचा स्वीकार केला होता. अंकोरवट हा जगातील भव्य मंदिरसमूह याच राजांनी बांधला. हिंदू स्थापत्यशास्त्र ग्रंथांवर आधारलेले हे मंदिर म्हणजे शिल्पकलेचा एक अद्‌भुत नमुना आहे. या मंदिराच्या स्थापत्यशैलीचे महत्त्व लक्षात घेऊन आणि भारतीय पुरातत्त्ववेत्त्यांच्या मदतीने युनेस्कोने हे मंदिर पुन्हा उभे केले आहे. यामुळेच कंबोडियाच्या पर्यटनक्षेत्राला मोठी चालना मिळाली.

कंबोडियातील ख्मेर राजांच्या आपापसातील भांडणातून चौथा जयवर्मन वेगळा होऊन त्याने अंकोरवटपासून पन्नास मैल दूर कोह कर (Koh ker) येथे आपली राजधानी वसविली. या राजाने तेथे एवढी मंदिरे बांधली की त्याचे नावच मुळी 'लिंगपुवा' म्हणजे लिंगाचे शहर असे पडले. या राजाने तेथे अंकोरवटसारखेच एक प्रचंड मंदिर बांधले ज्याला आज प्रासाद चेन (Prasat Chen) असे म्हणतात. वास्तविक हे मंदिर अंकोरवटपेक्षा मोठे असून अंकोरवटच्या आधी बांधले आहे. दुर्दैवाने यादवी युद्धामुळे झालेल्या पडझडीतून अजूनही या मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झालेला नाही.

व्हिएतनाम आणि कंबोडियामधील या युद्धामुळे सर्वांत जास्त फायदा झाला तो प्राचीन वस्तूंची तस्करी करणाऱ्या टोळ्यांचा. युरोप-अमेरिकेतील अनेक संग्रहालयांमध्ये आजही या मंदिरांचे अवशेष पाहायला मिळतात.

१९७२ साली प्रासाद चेन या मंदिरातील दुर्योधन आणि भीम यांच्या युद्धाचे शिल्प चोरीला गेले. १९७५ साली त्यातील दुर्योधनाचे शिल्प लंडनमधील लिलावामध्ये विकले गेले. अर्थातच नंतर ते कुठे आणि कोठल्या संग्रहकाकडे आहे याचा थांगपत्ता नव्हता. २०११ साली सोदबी (Sotheby) या लिलावसंस्थेने न्यूयॉर्कमध्ये पुन्हा ते दुर्योधनाचे शिल्प विक्रीला आणले. कंबोडियन सरकारच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यावर त्यांनी युनेस्कोच्या मदतीने हे शिल्प आपल्याला परत मिळावे, कारण तो आमचा सांस्कृतिक वारसा आहे, असे सांगून न्यूयॉर्कच्या कोर्टामध्ये या विक्रीकरीता स्थगिती मागितली. अर्थातच लिलाव करणारी संस्था याला फारशी तयार नव्हती. परंतु अमेरिकेचे विभागीय ॲटर्नी जनरल, भारतीय वंशाचे प्रीत भरारा यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे हे शिल्प कंबोडियाला परत देण्याचे मान्य करण्यात आले. जून २०१४ मध्ये समारंभपूर्वक हा दुर्योधन कंबोडियाला परत देण्यात आला. कंबोडियन सरकारच्या सांस्कृतिक सजगतेचे हे उदाहरणच नाही का?

दुर्योधनाबरोबरचा भीम मात्र अजून अमेरिकेतच आहे. १९७६ साली कॅलिफोर्नियामधील एका संग्रहालयाने तो लिलावात विकत घेतला. भीमही लवकरच कंबोडियात परत जाणार आहे. भारतात मात्र शेकड्यांनी अशा कृष्णापासून बुद्धापर्यंतच्या मूर्ती सांस्कृतिक बधिरतेमुळे उद्धाराच्या प्रतीक्षेत उभ्या आहेत.

१९४६ साली आंतरराष्ट्रीय संग्रहालय संस्था (International Council of Museums -ICOM) स्थापन झाली. सांस्कृतिक वारशाचे जनत आणि संवर्धन तसेच चोरी आणि निष्काळजीपणामुळे होणाऱ्या नुकसानीपासून त्याचे रक्षण करण्याकरता ही

(पृष्ठ क्र ४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | शिशिया डोंगरावरील बुद्धमंदिर | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | नर्मदा परिक्रमा (भाग : ७) | श्री. अरविंद ओक | ६ |
| ४) | दोन मूलभूत मापनपद्धतींची तुलना : व्हिट्रुव्हिअस आणि मयमत यांतील मूळ मापन कल्पना आणि त्यांची उपयोगिता | श्री. अरविंद फडणीस / डॉ. प्रभाकर आपटे | ९ |
| ५) | "संस्कृत कथावाङ्मयाला लाभलेले प्रा. मिशेल हान यांचे योगदान" | श्री. प्रशांत धर्माधिकारी | १५ |
| ६) | द्वारका व्हाया पोरबंदर ते सोमनाथ - एक अनोखी यात्रा | श्री. चंद्रकांत शिंगाडे | १८ |
| ७) | विश्व स्वधर्मसूर्ये पाहो | श्री. नरेंद्र गोळे | २१ |
| ८) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०

*भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.*

*अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.*

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०० ६०१

**http://www.vpmthane.org/bhaskara900/**

भास्कर ९००

# शिशिया डोंगरावरील बुद्धमंदिर

*चीनमधील शिशिया डोंगरावरील बुद्धमंदिराला दिलेल्या भेटीचे वर्णन करणारा लेख - संपादक*

२७ व्या नवनिर्मिती स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आम्ही नॅनजिंगला गेलो. स्पर्धेमधे जेव्हा मूल्यमापन करायचे असते तेव्हा फक्त प्रदर्शन सभागृहात केवळ विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो. विद्यार्थांसोबत आलेल्या मंडळींना ते त्या दिवशी बाहेर घेऊन जातात. नॅनजिंग येथील आयोजकांनी मात्र सहलीचे आयोजन करण्याऐवजी तो दिवस मोकळा ठेवला होता. ही संधी साधून त्या दिवशी शहरातील काही प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याचे आम्ही ठरविले. या शहरात पाहण्यासारखे काय आहे याची आम्ही स्थनिक लोकांकडे चौकशी केली. तेव्हा बहुतेक सर्वांनीच शिशिया डोंगरावर जाण्याचा सल्ला आम्हांला दिला. तेथे एक प्राचीन बुद्धमंदिर असल्याचे त्यांनी आम्हांला संगितले. आम्ही त्या ठिकाणाला भेट द्यायचे निश्चित केले. तसे शिशिया डोंगराचे अंतर गावापासून बरेच दूर होते. त्यासाठी आम्ही एक टॅक्सी ठरविली. गावातून बाहेर पडायला थोडा वेळ लागला. त्यानंतर मात्र आमचा प्रवास जलद गतीने झाला. चीनमध्ये सर्वत्र चांगले रस्ते आहेत. त्याचाच अनुभव पुन्हा एकदा येथे आला. साधारणपणे ४० किलोमीटरचे अंतर कापून आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो. बाहेरून येणाऱ्या प्रवाशांच्या दृष्टीने हे ठिकाण महत्त्वाचे असावे असे वाटते. मोठ्या संख्येने तेथे पर्यटकांची वाहने उभी होती. योग्य जागा शोधून आमच्या चालकाने आपले वाहन उभे केले. साधारणपणे दोन तासांनी भेटायचे ठरवून आम्ही त्याचा निरोप घेतला. डोंगरावर जाण्यासाठी एक प्रवेशद्वार बांधलेले आहे, ते पुढेच दिसत होते. प्रवेशद्वाराजवळच डोंगरावरील महत्त्वाच्या ठिकाणाची माहिती देण्यात आलेली होती. तिच्यावर आम्ही आधी नजर टाकली तेव्हाच आमच्या लक्षात आले की तेथे पाहण्यासारख्या अनेक जागा आहेत.



**प्रवेशद्वाराजवळील चित्र**

प्रवेशाचे तिकीट घेऊन आम्ही प्रवेशद्वारातून आत गेलो. डोंगराचा परिसर खूप मोठा आहे आणि संपूर्ण परिसर सुशोभित केले आहे. प्रवेश करताच डाव्या बाजूला एक सुंदर जलाशय आमच्या नजरेस पडला. तेथे कमळाची फुले वाढविलेली आहेत. जलाशयामध्ये पुतळे उभारलेले असून तेथपर्यंत जाण्यासाठी दगड टाकून वाट बनविलेली आहे.



**जलाशयातील पुतळे**

चालत चालत आपण जसे पुढे जातो तसे अनेक वाटा फुटतात. त्यांतील काही वाटा वरच्या दिशेला जातात.

आमच्याकडे मर्यादित वेळ असल्याने आम्ही वर जाण्याचे टाळले. आमचा उद्देश बुद्धमंदिर पाहण्याचा होता. आम्ही सर्वत्र नजर टाकली तेव्हा एक मंदिर आमच्या नजरेला पडले. त्या मंदिराकडे आम्ही कूच केले. मंदिराचा परिसर खूप मोठा आहे. सर्व बुद्धमंदिरांत असते तशी अगरबत्त्या पेटविण्यासाठी मंदिराच्या बाहेरच व्यवस्था आहे. दुरून मंदिर लहानसे दिसते, परंतु आपण पायऱ्या चढून मंदिराजवळ पोहोचलो की मंदिराचा भव्यपणा आपल्या नजरेस पडतो.



**टेकडीवरील बुद्धमंदिर**

मंदिरात जाऊन आम्ही मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर लगेच मंदिराच्या चौकशी केंद्रात गेलो. काही महिन्यांपूर्वी येथे एक प्रदर्शन भरले होते असे आम्हांला कळले. त्यात अनेक दुर्मीळ वस्तू प्रदर्शित करण्यात आलेल्या होत्या. त्यांची काही माहिती मिळते काय याची आम्ही चौकशी करीत होतो. आमच्या हातात महत्त्वाचे असे काहीच लागले नाही, परंतु मंदिराच्या मागच्या भागात उत्खनन केले असून त्यात बुद्धाच्या अनेक जुन्या मूर्ती सापडल्या असल्याचे तेथील व्यक्तीने आम्हांला सांगितले. त्यानुसार मंदिराच्या मागच्या भागाकडे आम्ही आमचा मोर्चा वळविला. तेथे आमच्या नजरेस एक जुन्या काळातला पगोडा पडला. त्याला शरीर स्तूप असे नाव असून त्या पगोड्याला भाविक मंडळी खूप महत्त्व देतात असे दिसते. अनेक लोक त्या पगोड्याभोवती प्रदक्षिणा घालत होते. अशा प्रकारचे शरीर स्तूप चीनमध्ये काही मर्यादित ठिकाणीच आहेत.



**जुन्या काळात बांधलेला पगोडा**

पगोड्याच्या बाजूलाच एक टेकडी आहे. याच टेकडीत उत्खनन करण्यात आले होते. जुन्या काळी म्हणजे सहाव्या शतकात टेकडीच्या सर्व बाजूने बुद्धाच्या मूर्ती कोरण्यात आल्या होत्या. कालांतराने त्या मूर्ती झाकल्या गेल्या. म्हणून टेकडी उकरून त्या मूर्ती उघड्या करण्यात आल्या. टेकडीच्या सर्व बाजूने अनेक मूर्ती आता आपल्याला दिसतात. म्हणून त्या टेकडीला सहस्त्रबुद्ध टेकडी म्हणतात. आम्ही चोहोबाजूंनी फिरून छायाचित्रे घेतली. त्यांतील काही छायाचित्रे खाली दिलेली आहेत.



**सहस्त्रबुद्ध टेकडी**

नक्कल करुन उत्तीर्ण होता येते, पण ज्ञान मिळत नाही.



**टेकडीतील मूर्ती**

शेजारीच एका टेकडीवर काही घरे आहेत. तिथे आम्ही गेलो. ती बुद्ध भिक्षूकाना राहण्यासाठी बनविलेली निवासस्थाने आहेत. सध्या तरी ती घरे ओसाड पडलेली आहेत. मंदिरात एखादा कर्यक्रम असेल तर बरेच लोक येतात, तेव्हा तेथे चांगलीच वर्दळ असते असे आम्हांला तिथल्या व्यक्तीने सांगितले. आम्ही आपले घड्याळ पाहिले आणि परत निघण्याचा निर्णय घेतला. कारण आम्हाला आणखी काही ठिकाणांना भेटी द्यायच्या होत्या. शिशीया डोंगरावर बघण्यासारखे खूप होते. खरेतर एक संपूर्ण दिवस तेथे खर्च करणे आवश्यक असते, परंतु आमच्याजवळ वेळ मर्यादित असल्याने आम्ही तिथून काढता पाय घेतला. त्याआधी त्या ठिकाणाहून दिसणारे सहस्त्रबुद्ध टेकडीचे तसेच घरांच्या रांगांचे छायाचित्र घ्यायला आम्ही विसरलो नाही. ती चित्रे खाली दिलेली आहेत.



**टेकडीवरून दिसणारे दृश्य**



**टेकडीवरून दिसणारे दृश्य**

मागील काही वर्षांत चीनने पर्यटन क्षेत्राकडे खूपच लक्ष दिलेले आहे. त्यासाठी त्यांनी गावागावांतील प्रेक्षणीय स्थळांचा विकास केला, शहरांतून तेथे जाण्यायेण्यासाठी दळणवळण यंत्रणा उभी केली आणि तिथला परिसर स्वच्छ राहील याची काळजी घेतली. त्याचबरोबर, वेगवेगळ्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती सहज उपलब्ध होईल यासाठी लहालहान पत्रके छापून हॉटेलांत ठेवली. त्यामुळे पर्यटन व्यवसायाला चांगलीच गती मिळली आहे. त्यातून देशाला परकीय चलन तर मिळतेच, त्याचबरोबर स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. काही दशकांपूर्वी चीनमध्ये जाणे अशक्य होते. आता मात्र चित्र बदललेले आहे. अलीकडच्या काळात पर्यटक चीनमध्ये मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत. महत्त्वाचे हे की त्यांची कुठेही गैरसोय होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाते. मला वाटते, भारताला या बाबतीत चीनकडून शिकण्यासारखे खूप आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
विद्या प्रसारक मंडळ,
ठाणे

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ७**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत- संपादक*

**दिवस २४ वा - अंकलेश्वर - रामकुण्ड - बुलबुलाकुण्ड शिवमंदिर सकाळी ६.०० ते दुपारी ३.०० (१५ कि.मी.)**

उघडाबोडका रस्ता, सकाळी काही ठिकाणी मैय्यासमर्पित स्वागत म्हणजे बिल नाही. साडेआठ-नऊ नंतर उन्हाचा त्रास जाणवू लागला. १० कि.मी. हांसोट रस्त्याने चालल्यावर रामकुंडासाठी डावा रस्ता धरला. सगळी सुबाभळ तीही खड्ड्यात, रस्त्याच्या कडेला आहे ती तुळशीएवढी, सावली नाही. साडेअकरापर्यंत उन्हामुळे इतके त्रासलो की नको ते रामकुंड अशी अवस्था झाली. उन्हात चालण्याची शिक्षा बराच वेळ भोगल्यावर कान्हुआ गाव आले. म्हशींची विपुलता पाहून स्नानाची सोय विचारली म्हशी पाणी पितात त्या हौदातून स्नान व कपडे आटोपले. मंगलने खिचडीची विनंती हळूच सरकविली व आम्ही तृप्त होऊन बाहेर पडलो. ते घर एका सधन ब्राम्हणाचे होते.

रामकुण्डाची वाटचाल पुन्हा बोडक्या रस्त्यावरून सुरू . स्नान कपडे केले तेव्हा हेच ऊन तापदायक वाटले नव्हते, परंतु आता मात्र विघ्न म्हणून ते आम्हांपुढे ठाकले होते.

म्हणे रामाने बाण मारून हे कुंड निर्माण केले आहे. हायवेपासून इतक्या दूर बाण मारण्यापेक्षा जवळच कुठेतरी मारला असता तर किती बरे झाले असते असा नको तो विचार डोक्यात पुन्हा पुन्हा येत होता.

साडेतीन वाजता स्थान आले. कळस दुरूनच उपस्थिती दर्शवीत होता. कुण्ड पाहिले. अद्‌भुत आहे. पाण्याला उकळी यावी तसे बुडबुडे कमी अधिक जोराने पाण्यावर सतत येत होते. पाणी खारट व थंड होते. हे बुडबुड्यांचे रहस्य किंवा वैज्ञानिक दृष्टिकोन काहीही असो, परंतु हजारो वर्षांपासून पाण्याला सतत येणारी उकळी ही दैवी आहे हे नक्की. प्रत्यक्ष नर्मदामैय्याची उपस्थिती या कुण्डात आहे हे म्हणणे संयुक्तिक वाटते.

रामकुंडाकडे येणारा दुसरा जवळचा रस्ता असून तो बोडका नसून सावलीचा आहे हे पोहोचल्यावर समजले. नर्मदे हर!

**दिवस २५ वा - मु. हनुमान टेकडी-बुलबुला कुंड - हनुमान टेकडी - गढी ? २० कि. मी.**

सकाळी ६ वाजता अंधारातच चालायला सुरुवात केली. आतला रस्ता असल्याने रहदारी नव्हतीच. रस्ता मात्र चांगला होता. कालही आणि आजही या रस्त्याला छाया देणारे वृक्ष नाहीतच. सकाळची वेळ असण्याचे कालच्यासारखा त्रास झाला नाही. ११ वाजता हांसोटला पोहोचवी. सूर्यकुण्ड पाहिजे व सुरत रस्ता सोडून कठपोर रस्ता धरला. या रस्त्यावर मात्र दोन्ही बाजूला असणाऱ्या पुराणवृक्षांची सुंदर छाया होती. त्यातून रस्ता नूतनीकरण सुरू होते. JC B लावून एका बाजूने खणून रस्ता रुंद होत होता. भरपूर खडी टाकून पूर्ण रस्त्यावर पाणी मारून खडी दाबणे सुरू होते.

छायेतून वाटचाल करतानासुद्धा मला मात्र पार गळून गेल्यासारखे झाले होते. काय होतेय ते कळत नव्हते. याआधी रस्ता उन्हातून होता तेव्हा डोक्याचा कानावरचा भाग फुटून निघतो का काय असे वाटत होते. B.P. ची

गोळी तर सकाळी आठवणीने घेतली होती. ११ वाजता हांसोटला न्याहारीसुद्धा थोडीबहुत केली होती.

माझा शक्तिसंचय शून्यावर आल्यासारखा मी पाय ओढत, थांबत, जागोजाग सॅक टाकून बसकण मारत चालत होतो. एका ठिकाणी बसून सर्वांनी होती ती बिस्किटे खाली आणि उमगले की भुकेमुळे शक्तिशून्यता आली होती.

एक वाजायला आला होता. रोज १२॥ वाजता मैया भोजनाची सोय करते हे गेले काही दिवस आम्ही अनुभवीत आहोत. आज मात्र ही शक्यता नव्हती कारण या रस्त्यावर काही म्हणजे काही मिळत नाही. हांसोटला जे काही मिळावे असेल त्यानंतर काही नाही. या रस्त्यावर शेती भरपूर पाहिली, पण गावे मात्र अपवादात्मक !

आज वाटेत चहासुद्धा नाही तर भोजन कुठून ? आम्ही बिस्किटे खाऊन पुन्हा मार्गस्थ झालो. तरतरी आली होती तेवढ्यात समोरुन येणारी मोटरसायकल थांबली. पाणी पिणार का अशी विचारणा करून जवळचे थंड पाणी आग्रहाने दिले. पाठोपाठ विचारले, 'भोजन करोगे?! आम्ही खाल्ले आहे असे सांगितले तर त्याला नक्की माहीत होते की इथे काहीही मिळत नाही. जवळच्या पिशवीतून ॥ Shift ला खाण्यासाठी घरून आणलेले लुसलुशीत थेपले - सगळी पिशवी आमच्या स्वाधीन केली व घनश्याम नावाचा तो तरुण बाइकला किक मारुन निघून गेला.

खरे म्हणजे आमच्यापुढेच चार-आठ पावले एक गट चालत होता, परंतु इतर कुणाच्या नाही तर आमच्या नशिबातच फक्त आम्हांलाच मैय्याने हा भोजनप्रसाद दिला.

पुढे एका मंदिरात आम्ही ३ वाजता पोहोचलो तेव्हा पुढे गेलेला हा गट कणीक घेऊन पोळ्या करण्यात गुंतला होता.

म्हणजे मैय्याने खरोखर आमचीच निवड का केली ते आता कळले.

सावली संपली आणि रूक्ष बोडक्या रस्त्यावरून वाहनांनी उडविलेली धूळ झेलीत आम्ही कसेबसे हनुमान टेकडी आश्रमात पोहोचलो तेव्हा ४ वाजायला आले होते.

चहा तयार होता, भोजनही होते. मी खिचडी खाऊन घेतली.

स्नान करण्याची इच्छा होती, परंतु उरलेले ५/६ कि.मी. पार करून कठपोर गाठावे अशी इच्छा नव्हे आग्रह सौ. मंगलचा होता.

सकाळी उठून चालायचे सूर्य उगविण्यापूर्वी आणि सूर्य मावळला तरीही चालत राहायचे, त्यातच असे बोडके रस्ते व सरळ ऊन.

ही आनंदयात्रा राहिली नसून आता शिक्षा यात्रा वाटायला लागली आहे.

कठपोरला पोहोचल्यावर / किंवा मुक्कामी पोहोचल्यावर स्नान करावे असे सौ. मंगलचे म्हणणे असते, परंतु त्याआधी स्नान करणे हिताचे असते हे मला आता अनुभवातून कळले आहे.

जेवायचा वेळ, स्नान व कपडे यासाठीचा वेळ हा अनिवार्य आहे आणि प्रवासाचा तो एक भाग आहे. एरव्ही सकाळी उठून सुरुवात करून संध्याकाळी कितीही उशीर झाला तरी अमुक एक गाव गाठायचेच म्हणजे Production Oriented दृष्टिकोन झाला.

आता स्नान करण्याला असलेला तिचा उघड विरोध डावलून मी स्नान कपडे उरकले. अशोकलाही कुणीतरी सल्ला दिला की आजचा मुक्काम इथेच करणे हिताचे आहे पुढे कुठेच काही सोय नाही व रस्ता असाच आहे.

स्नानाला जाताना मी सांगितले की स्नानानंतरही पुढे चालण्याची माझी मानसिक तयारी नाही.

होणाऱ्या उशिरामुळे उन्हाळ्यात एक-एक दिवस

नियमांचा अंमल शरीरावर चालतो, मनावर चालू शकत नाही.

वाढेल ही भीती आणि ऊन तर असणारच आहे हे मंगलचे म्हणणे माझ्या फारसे पचनी पडले नाही. एवढी दगदग मला सोसणार नाही. हे Hectle Schedule मला मानवणार नाही त्यामुळे मिठीतवाईला किंवा शहरात पोहोचल्यावर मी ATM मधून पैसे काढेन व घरी परत जाईन असे सांगून मी स्नानास निघून गेलो.

मी परत आलो तेव्हा सर्वांच्या सॅक मंडपात गेल्या होत्या. सौ. मंगल मात्र रागातच होती. एक शब्दही बोलली नाही.

संध्याकाळी खिचडी खाल्ल्याने मी रात्री जेवलो नाही डायरी लिहून झोपून गेलो.

हा आश्रम अगदी वैराण भूखण्डावर आहे, परंतु तापीचे पाणी कालव्याद्वारे आश्रमातही पोहोचले. शेततलावाप्रमाणे एक मोठा चौकोनी, पाण्याने भरलेला तलावही आवारात आहे. स्नानासाठी वेगळी जागा आहे. कालव्याचेच पाणी (बहुधा), त्यातून बादलीने पाणी काढायचे, त्यासाठी छोटा पायरी घाट तयार केलेला आहे. एकूण तीन मंदिरे आहेत पैकी एक मजली हनुमान मंदिर, दुसरे आधुनिक काचबंद पहिल्या मजल्यावर यमाचे? की शनीचे? मंदिर तिसरी यज्ञ टाळा.

मंदिराचा परिसर संपून मोकळा भाग कधी लागतो समजत नाही. इतका मोकळा परिसर आहे. झाडेझुडपे नसल्याने लांबवरून आश्रम दिसतो.

कालव्यातील पाण्यात मासे औषधालही नाहीत हे आश्चर्यकारक वाटते. आतापर्यंत दोन-चार आश्रमांत उतरायचा योग आला. मातारामांची काही वेगळी सोय नसते. स्त्रिया आपापल्या गटाबरोबर राहतात, जेवतात.

नर्मदापरिक्रमा करणारे MP व गुजरातचे भाविक आहेत. महाराष्ट्राची ओळख गेल्या ५ वर्षांपासून नर्मदेला झाली. नर्मदापरिक्रमा यापूर्वी साधकांना परिचित होती व गुर्वाज्ञने ती होते. परंतु नर्मदापरिक्रमेवरील मराठी २-४ पुस्तकांपैकी जगन्ना कुंटेंच्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आणि मराठी मनाला त्या पुस्तकाने अधिकाधिक प्रेरित केले.

शास्त्रीजींबद्दल कुंटेने केलेल्या,'शास्त्रीजी म्हणजे पांडुरंगशास्त्री ना? समाजाला फार लुटले याने!' या विधानावर मी त्यांना मोठे लेखी पत्र त्याच दिवशी दिले होते. कुंटे हा माणूस काय लायकीचा आहे हे त्याच्या शिव्या अन् सिगारेट फुंकण्यावरून आणि अहंकाराणे भरलेल्या वचनोक्तीवरून मला त्या दिवशी कळण्याअगोदर, त्यानेच 'कालिंदी' या स्वतःच्या पत्नीवर लिहिलेल्या कादंबरीवरुन मला कळलेच होती.

जगन्नाथ कुंटेच्या 'नर्मदेहर' नंतर 'कालिंदी' वाचनानंतर त्याच्याविषयी गगनभरारी घेणारे मूल्यांकनाचे विमान अगदी पार कोसळून पडले.

असो, परंतु त्याच्या लेखनाने महाराष्ट्र प्रेरित झाला ही गोष्ट मात्र खरी !

एक-दोन अपवाद सोडले तर आम्ही स्नानासाठी साबण वापरलेला नाही. कपडेही बुचकळून वाळवायचे. तरीही अंगाला किंवा कपड्यांना दुर्गंधी नाही. संध्याकाळी आतले सगळे कपडे घामाने ओले झालेले असतात हे विशेष, तरीही दुर्गंधी नाही.

घरी अंगातून काढलेला गंलीफ्रॉक पुन्हा घालू शकत नाही. बाहेरुन आल्यावर तो कपडा काढूनच टाकावा लागतो. इथे मात्र काहीतरी अद्‌भुत अनुभवतो आहे. केवळ, 'हवा कोरडी आहे' हे उत्तर चपखल बसेल का?

कालचा दुपारचा थकवा सोडला तर निघाल्यापासूसन कायम चैतन्य अनुभवतो आहे. सकाळी आपोआप ५ वा. जाग येते. निघतो ते उत्साहाने. संध्याकाळी गावात पोहोचून

(पुढील पृष्ठ क्र. २० वर)

# दोन मूलभूत मापनपद्धतींची तुलना : व्हिट्रुव्हिअस आणि मयमत यांतील मूळ मापनकल्पना आणि त्यांची उपयोगिता

*कोणत्याही विज्ञानशाखेला मोजमापाची जोड असणे आवश्य असते. पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र तसेच शिल्पशास्त्रामध्येही मोजमापनाला महत्त्व आहे. या लेखामधून प्राचीन आणि मध्ययुगीन शिल्प ग्रंथामधील मोजमापनाच्या पद्धतीचा उहापोह केला आहे - संपादक*


## १. सारांश

दोन मूलभूत मापनपद्धतींची स्थूल रूपरेषा सादर करणे हा या निबंधाचा उद्देश आहे. त्यातील पहिला ग्रंथ आहे व्हिट्रुव्हिअस यांचा (इ.स. पूर्व पहिले शतक) De Architectura Libri Decem आणि दुसरा ग्रंथ मयमतम् हा दक्षिण भारतीय वास्तुग्रंथ (अंदाजे ९०० इ.स.). पहिले अवघड काम म्हणजे वास्तूचे मूलभूत मापन युरोपीय आणि भारतीय संकल्पनांचे तुलनात्मक परिशीलन आणि दुसरे यांची उपयोजन क्षमता युरोपीय आणि भारतीय पुरातत्त्वीय स्थापत्य पुराव्यांच्या अनुशीलनाधारे ताडून पाहणे आणि सादर करणे. या निबंधाच्या शेवटी या दोन्ही स्थापत्यग्रंथांच्या आधारे या दोन परंपरांतील मूलभूत मापनशैली, अंगभूत गुणवत्ता आणि उपयुक्तता यांचे मूल्यमापन निष्कर्षरूपाने मांडले आहे.


## २. विषयप्रवेश

मूलभूत मापनपद्धती किंवा दुसऱ्या शब्दांत सापेक्ष मापनपद्धती जिचा गाभा म्हणजे परंपरागत स्थापत्यशास्त्रीय संकेत होय. या पद्धतींचा वापर करून शिल्पकार अथवा स्थपती -

अ) वास्तुउभारणीच्या प्रकल्पासाठी एक सलग असा आराखडा तयार करू शकतो.

ब) बांधून होत असलेल्या स्थापत्य-रचनेचा गुणवत्तेनुसार अंदाज बांधू शकतो.

क) प्रकल्पातील अनेक नियोजित अंगोपांगांची निर्मिती अगोदरच करून ठेवू शकतो.

ड) बांधकामाच्या ठिकाणी अचानक उद्‌भवू शकणाऱ्या संभाव्य धोकादायक घटना टाळू शकतो.

या मुद्द्यांच्या विवेचनासाठी मी मुख्यतः Pierre Gros आणि Bruno Dagens यांच्या लिखाणांचा आधार घेतला आहे.

## ३. व्हिट्रुव्हिअस आणि मूलभूत मापनाची व्याख्या -

व्हिट्रुव्हिअसच्या तात्त्विक विवेचनानुसार Modulus म्हणजेच मूलभूत मापनाचे एकक किंवा मापदंड हा परस्पर संलग्नता मोजण्याचे परिमाण आहे. ते परिमाण असे आहे की ज्याच्या मदतीने इतर मोजमापे ठरवता येतात. व्हिट्रुव्हिअसने मूलभूत परिमाण आणि मूलभूत मापनपद्धतीची संकल्पना मांडताना अनेक पारिभाषिक संज्ञा वापरल्या आहेत. त्या अशा : Symmetria, com-modulatio, com-mens, modulus आणि rata pars मोड्युल्स ही संज्ञा व्हिट्रुव्हिअसच्या अगोदरपासून प्रचलित होती. कारण ग्रीक परंपरेत त्याचे पूर्वरूप Metron हे होते. आणि त्याचे लॅटिन प्रतिरूप Modus आणि संक्षिप्तरूप Modulus होते. शिवाय मापनाची परस्परसंलग्नता दाखवणारा व्हिट्रुव्हिअस हा एकमेव आणि आद्य चिंतक नव्हता. प्रत्यक्षात ही संकल्पना संगीत, काव्य आणि भूमापनात प्रचलित होती. (Modulus arearum) [ संदर्भ - Gros 1990.60, com-mensus आणि com-mudulatio या संज्ञा मापन पद्धतीचा निर्देश करतात तर modulus आणि rata par प्रत्यक्ष modulus म्हणजे मापदंडच सुचवतात. (Ten books on Architecture : 1-2, III-1.9, III-3.10, III-5.8) rata pars याला बहुधा

ग्रीक परंपरा आहे. ती म्हणजे rheton meros किंवा rhetos. Rhetos या संज्ञेचा अर्थ आहे एकभाग किंवा सामान्य परिमाण : koinon metran; अर्थात rata pars ज्यात rata चा अर्थ आहे विमर्श किंवा व्याख्या. हेही शक्य आहे की rhetas आणि rata यांतल्या उच्चारणसाम्यामुळे ही लॅटिन संज्ञा प्रचारात आली.

शिवाय व्हिट्रुव्हियन प्रतिपादनात मूलभूत मापदंड ही कल्पना सर्वच्या सर्व सहा संज्ञांमध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे मूळ कल्पनेचा आराखडा तयार करणे आणि गुणवत्ता साधणे यांसाठी ती उपयोगी ठरते. त्या सहा संज्ञा म्हणजे euryhnia, decor, distributio, dispotio, ordinatio आणि symmetrica या संकल्पनातून असे दिसते की मील-परिमाणे ही मुख्यतः रचनात्मक कामासाठी वापरली गेली. Disposia आणि Ordinatio यातील पहिली पायरी म्हणजे ड्राफ्टस्मनने कंपास किंवा सेटस्केअर वापरून रचनात्मक आराखडा आणि त्यानुसार वास्तुरचनेची मांडणी करणे.

Module अर्थात मूलपरिमाण ही त्रिमिती असलेली संकल्पना आहे. तिचा संदर्भ निरनिराळ्या बांधकामाच्या नियोजनात लावता येतो. तिचा अर्थ Columma trigliphus embater असा आहे. याचे त्रिविध अर्थ परिमाण आहे.

१. Ionic स्तंभाचा व्यास columma दंडाच्या बुंध्याशी = D

२. Doric Entablature da Doric आलंकारिक भागाची रुंदी triglyph = T

३. संख्यात्मक गुण the embetar, मूल परिमाण जे नेहमीच एक असते. = D/T मूलात्मक अर्थाने असतो.

व्हिट्रुव्हिअसच्या मूलमापनाचा उद्देश या संपूर्ण भागात असलेल्या भागांचे एकमेकांशी असलेले नाते हे सुस्पष्ट व्याख्यात्मक रितीने सांगणे हा आहे. ही नाती रचनेला एक तार्किक सुस्पष्टता आणतात. व्हिट्रुव्हियन तत्त्वामध्ये मापेही एकतर मूलमापनाच्या गुणाच्या पटीने अथवा अपूर्णांकाने असतात (विशेषतः पुस्तके III व IV पाहा)

व्हिट्रुव्हियन मूलमापन पद्धती ही निश्चित सापेक्ष प्रमाणावर आधारलेली आहे. ती Doric, Ionic आणि Corinthian ह्या पद्धतींसाठी आणि दोन स्तंभांतील अंतरासाठी वापरेली आहे. (Interdolumnation) त्याचे प्रकार (species, pycnostylus, systylus, eustylus, diastylus and a raeostylus) ह्यातील शेवटच्या तिन्ही पद्धतींमध्ये मुक्तपणे वापरल्या जात नाहीत. आणखी एक लक्षात ठेवले पाहिजे की, मूलमापन आणि मूलात्मक मापन ह्यांचे नाते स्पष्टपणे जोडले नाही. वास्तविक त्या काळी ती पद्धत वापरली जात होती.

H. Knell (१९८५) ह्यांनी मूलमापनाचे गुण सांगणारे कुतूहलपूर्ण गृहीतक धरणारा लेख सादर केला आहे. तत्त्वात्मक दृष्टीने मूलमापन हे संपूर्ण वास्तुप्रकल्पातील मोजमापावर खालीलप्रमाणे परिमाण करू शकते.

D/T>M>h>H>B>L

इथे h= स्तंभाची उंची, उभट उंची - H, स्तंभातील अंतर - M - (मोकळेपणाने वावरण्यासाठी), रुंदी = B, लांबी L हे सर्व मूलमापणापासून निर्माण होतात.

४. ह्या प्रकारच्या मूलमापनाने निर्णायक महत्त्वाच्या मापांचा अंदाज बांधणे कठीण असते. उदाहरणार्थ B आणि L बांधकामाच्या जागेवर रचनेच्या शक्यता ह्या मर्यादित असतात. प्रत्यक्षात अशा प्रकारचे मूलमापन वापरता येऊ शकेल आणि सर्वांत महत्त्वाची मापने ही प्रथम भागाकार करून ठरावीक मुलमापनाच्या संख्येत आणायची आणि मूलमापन १२, १६ हे पायाच्या बाराव्या किंवा सोळाव्या भागाशी जुळवून अशा प्रकारे पूर्णत्वाला न्यावे. आपल्याला हे माहीत नाही की ग्रंथकर्त्यांने स्वतः ह्या तीन genera साठी काही प्रत्यक्षात उपयोगी गुणसंख्या

काढल्या असतील आणि त्या कोष्टकरूपाने मांडल्या असतील, ज्यामुळे ती कोष्टके हाताशी राहातील आणि बांधकामामध्ये किंवा रचनेमध्ये वापरता येतील. अस्तित्वात असलेल्या उच्चप्रतीच्या ग्रीक Hellenistic, Mediterranean आणि रोमन शिल्पशास्त्रामध्ये मूलमापनाच्या संकल्पना आणि व्हिट्रुव्हिअसने मूलमापनाचे तयार केलेले नमुने वापरलेले दिसत नाहीत. 1. Fray (1989), Donnees architecturates et Hypotheses surla mathematique pre-euclidienne. le partage harmonique आणि J.T. De long (1989), Greek Mathematics, Hellenistic Architecture and Vitrurlus's De Architectura ह्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचे परीक्षण करता असे जाणवते की ह्यातील Frey असे दाखवितात की नावाजलेली Doric स्मारके Paestum चे the Heralon (शिल्पकार अज्ञात) आणि अथेन्समधील Acropolis मधील propylon (of Mnesikle) ही सर्व रचनेसाठी गणित आणि संगीत ह्यांवरील पायथागोरियन तत्त्वावर आधारलेली आहेत. नंतरचे दुसऱ्या बाजूला Dejong असे पटवून देतात की भूमितीतील Euclidian तत्त्वे Asia Minor मधील Hellenistic मंदिरातील रचनेसाठी वापरलेली आहेत. नावाजलेले Pergamon, Priene आणि Magnesia येथील मंदिरे ही व्हिट्रुव्हिअस आणि त्याचे तिसरे पुस्तक ह्यांसाठी निर्णायक महत्त्वाचे ठरतात. दोन्ही गोष्टींमध्ये व्हिट्रुव्हियन गणित आणि संगीत ह्यांतील तत्त्वांचा रचनेसाठी कसा वापर करायचा ह्याची जाणीव होती असे दिसते. विशेषतः दुसऱ्या गोष्टीप्रमाणे व्हिट्रुव्हियन स्पेनमध्ये मूलमापनाच्या Euclidian तत्त्वांचा मोठा सहभाग असायला हवा होता. पण तसे घडले नाही.

लहान आणि अत्यंत अचूक मूलपरिमाणाच्या मदतीने उंचीची परिमाणे ठरवून घ्यावीत. विशेषतः स्तंभाचा वरचा व्यास D (दण्ड) हे मूलमापन अनेक भागांची मापे ठरविण्यासाठी वापरले जाते. उदा. entablature आणि Attic, मयमताप्रमाणे संपूर्ण इमारतीची रचना आणि तिची मापे ही ह्या मूलपरिमाणावर आधारलेली असावीत. ही विधाने माझ्या मते व्हिट्रुव्हिअसच्या तत्त्वांशी मिळतीजुळती आहेत. जरी हे परिमाण दिसायला आदर्शवादी असले तरी ग्रंथांमधील दुसरे परिमाण B त्याचीसुद्धा दखल घ्यायला हवी. ह्याच्या साहाय्याने विस्तृत देवळांच्या क्षेत्रफळांची योजना तयार करता येते. शिवाय मूलमापन D शीदेखील त्याचे साम्य दिसते. (व्हिट्रुव्हिअसच्या तत्त्वाशी) ह्याचे कारण गोलाकार मितीसकट (conceptric) संपूर्ण योजना ही ह्या एका मूलपरिमाणाच्या साहाय्याने तयार करता येते.

स्तंभाची उंची हे एक महत्त्वाचे मूलमापन आहे. लिखाणामध्ये वेगवेगळ्या गुणोत्तराने व्यास D शी हा तुलनात्मक पद्धतीने जोडलेला दिसतो. त्यातून मिळणाऱ्या मापाने इमारतींची संपूर्ण उंची 'H' ही ठरवता येते. याचे कारण इतर उंचीचे स्तर सर्व महत्त्वाच्या स्तराप्रमाणे (पादवर्ग) त्यांची मापे काढता येतात. अशा प्रकारे स्तंभांच्या व्यास D मुळे ह्या बाबतीत उंचीचे परिमाण काढता येते.

पूर्वी मी सांगितल्याप्रमाणे तुलनात्मक मापनांना मूलमापन म्हणून अजिबात धरता येत नाही. ते मिळविण्यासाठी इमारतीच्या एखाद्या निश्चित भागाच्या मापाला भागल्यानंतर निवडलेल्या भागाच्या संख्येतून मिळते.

अशा प्रकारचे माप वापरसे जाते. उदाहरण म्हणून बहुमजली देवळांच्या बाबतीत उंची हा एक निश्चित तुलनात्मक भाग 'P' धरून तुलनात्मक उंची ह्या दाखवल्या जातात. ह्या भागाचे मापन हे सर्वमान्य प्रमाण 'N' हे धरून प्रथम रुंदी 'B' वरून ठरवले जाते. नंतर मग 'P' हा उंची 'H' ला 'R' च्या भागाच्या संख्येने भागून मिळतो. 'P' हा उंचीमध्ये असतोच. महान भाग 'p' म्हणजे socles आणि bases हे 'p' शी सख्य ठेवून असतात. ते ह्याच प्रकारे मिळवले जातात. जसे मनाला वाटेल त्या संख्येने भागून; परंतु ह्या बाबतीत socle, bases किंवा capital ह्यांची

संपूर्ण उंची धरून नंतर हे भाग ओतीव संच आणि इतर लहान गोष्टींसाठी परिमाण म्हणून वापरले जातात.

थोडक्यात एका परिमाणापासून ही अनेक मापने मिळविली जातात. ते एक मूलमापन 'B' किंवा 'D' असते. शिवाय प्रबंधातून सापेक्ष प्रमाण आणि निर्विवाद मापने मिळविण्यासाठी अनेक उद्‌बोधक परिमाणे दिली आहेत. मापनेही.

याउलट तो मूलमापनाची एक साधी संकल्पना सादर करतो. कदाचित ज्युलियस सीझरकडे सैनिकी अभियंता म्हणून कार्यरत असता catapults आणि इतर सामरिक यंत्रांतील कल्पना येथे वापरल्या असाव्यात.

**मयमत आणि मूलमापनाची व्याख्या -**

मयमत, दक्षिण भारतीय शिल्पशास्त्रीय तत्त्वामध्ये मापनासाठी सापेक्ष प्रमाण पूर्णपणे सुसंगत पद्धतीने दिले असल्याचे दिसत नाही. परंतु, रचना आणि मापे ह्यांसाठी लागणाऱ्या साधनांचा संच मयमत हा ग्रंथ सादर करतो. हे सर्व कदाचित निरनिराळ्या इमारतींच्या प्रकारांना लागत असणाऱ्या विविध मूलमापन पद्धतींचे वर्णन दिलेले असल्याने असे वाटते असावे.

३. मयमतामध्ये स्वरसंवाद आणि चांगली सापेक्ष प्रमाणे त्यांची साधारण संकल्पना दिली असती तरी लेखनात ती व्याख्यारूपाने दिलेली नाही. ही संकल्पना ‘मान’ ह्या वाङ्‌मयीन भाषेत मोजणी मापन किंवा मोजण्याचे मूळ परिमाण अशी आहे. पण साधारणपणे स्वरसंवाद आणि चांगले सापेक्ष प्रमाण हे व्हिट्रुव्हियन Symmetria ला समांतर असल्याचे तुलनेने जाणवते. ह्या दोन्हीतील जाणवणारे साम्य एकतर अपघातात्मक किंवा इमारतीतील प्रत्यक्षातील सारखेपणा ह्या दोन्ही संज्ञांच्या वाङ्‌मयीन अर्थावरून जाणवते. ह्याचे कारण व्हिट्रुव्हिअसने सांगितलेल्या कल्पना म्हणजे मापनाचे मूलप्रमाण स्पष्टपणे तयार करणे किंवा मोजणे. ही संकल्पना स्वरसंवादाशी स्वतःशी जुळणारी आणि संपूर्णतेशी जुळणारी असावी.

४. मयमत एक मूलमापन पद्धती सादर करते. ह्यातील सारखेपणाची तत्त्वे (symmetry) आणि व्हिट्रुव्हिअसने मांडलेल्या विचारांची रीत ह्यांच्यामधील मूळ कल्पना, योजना ह्यांत विलक्षण साम्य जाणवते. अंश, भक्ती, भाग ह्या संज्ञांचा अर्थ विभागणी सा आहे. जो एखाद्या भागाला किंवा समग्रतेला दिला जातो. दंड ही संज्ञा म्हणजे व्यावहारिक भाषेत ‘दांडा’ असे आहे. ह्या बाबतीत त्याचा अर्थ त्याची जाडी असा होतो. इथे त्याचा अर्थ स्तंभाचा वरील भागातील व्यास D असा आहे. शिवाय anthropomorphic (म्हणजे मनुष्यरूपाचा) भाग ही संपूर्णतेची संकल्पना तिच्या विनाश कल्पनेशिवाय असते.

व्हिट्रुव्हिअसच्या तत्त्वामध्ये एक आणि मूलमापन फक्त D किंवा T असे मिळते. पण मयमतामधून अनेक निरनिराळी मूलमापने आणि मापनासाठी आणि रचनेसाठी अपूर्णांक मिळतात. मूलमापनाचा आकार आणि प्रकार ही त्यांच्या त्यांच्या परिस्थितीनुसार व कामाप्रमाणे बदलत जात असतात. Bruno Dagens यांनी सापेक्ष मोजणी ही अपूर्णांक किंवा अमर्यादित आणि मूलमापन आणि मर्यादित अशा भागांत विभागली आहेत. मी निरनिराळ्या मूलमापनांना आणि त्यातील अत्यंत महत्त्वाच्या साधित शब्दांना खालील रूपके दिली आहेत -

मूलमापनाची सापेक्ष मोजणी

१. स्तंभाचा वरचा व्यास (दंड) = D

२. घराची रुंदी, मूलमापन म्हणून = B

३. दोन स्तंभांतील अंतर = M

अपूर्णांकांची सापेक्ष मोजणी

४. उंची ‘H’ ला प्रश्नातील भागांच्या संख्येने विभागून येणारा मूलमापनाचा भाग जो उंचीचा स्तर दाखवतो (अंश= भाग)

५. अंगाला विभागून येणारे उपांग - उदाहरणार्थ pedestal किंवा capital हे असलेल्या संख्यांचा

भाग जो लहान मूलमापन विभागल्यानंतर मिळतो = P

उभट मापन

६. रुंदी 'B' पासून मिळणारी सर्व मापे उंची = 'H'

७. स्तंभाची किंवा pi;aster ची उंची जी मूलमापन 'D' शी निश्चित सापेक्ष प्रमाणात असते. त्याचबरोबर सर्वांत महत्त्वाच्या स्तराची उंची = 'h'

८. स्तंभाच्या उंचीपासून दिलेल्या अन्य स्तरांच्या सर्वमान्य परिमाणाची बोरीज करून काढलेली उंची = 'H' (utesedha) ($n_1$ x h + $n_2$ x h + .... $n_n$ x h)

मूलमापन B आणि M त्यांच्या स्वभावानुसार आकृतीशी संबंधित असू शकतात.

रुंदी B शी संबंधित असण्याची शक्यता असते आणि त्याचा (वास्तुपुरुषमंडल) M आणि किमान मूलभूत रेखांशी मोजण्यापर्यंत संबंधित असलेले ‘परिमाण सूत्र’ (अक्षांची फुली) आणि ‘पर्यंतसूत्र’ (आकृतीची परिमिती)

अशा प्रकारे आकृतीही एक ढोबळ साधन बनते. पण विस्तृत अशा किरकोळ बाबी देण्यास कमी पडते. कुठल्याही अवघड कामाची सुरुवात करण्याआधी सवा४त महत्त्वाची मोजणी शुभकारक आणि फलज्योतिष ‘आयादि’ सूत्रानुसार रचनाचा आधार हा पूर्णपणे निश्चित केलेला असावा.

अंक्षमध्ये ‘अंगुळ’ आणि ‘हस्त’ आणि किष्कुहस्त (२४ अंगुळ) माझ्या मते ह्यासाठी दिलेली पद्धती पुढीलप्रमाणे आहे.

(a) B>M>H>P>D>p

इथे इमारतीची रुंदी ही दिलेली आहे. त्याचा आराखडा सुस्पष्ट ठरलेला आहे. त्याचे थर आणि मजले माहित आहेत. तुलनात्मक सर्वमान्य प्रमाण N हे सुद्धा ठरलेले आहे.

(b) दुसऱ्या पक्षी D>h>M>B>H>p

इथे स्तंभ आणि architrave चे कमातीचे अंतर म्हणजेच D, M आणि h हे माहीत आहेत. तसेच उंचीचे निरनिराळ्या स्तरांचे सर्वमान्य परिमाणदेखील माहीत आहे. अशाप्रकारे भागांच्या मापांची बेरीज करून महत्त्वाची मापे 'B' आणि 'H' ही मिळविली जातात. म्हणजेच दोन स्तंभातील अंतरांची संख्या आणि उंचीचे स्तर मिळतात.

ह्या गृहीत धरलेल्या पद्धतीने मला प्रत्यक्ष बांधकामाच्या जागेवर ही मापे कशा प्रकारे कृतीत आणता येत असतील ह्याचा तर्क बांधता येऊ लागला. स्वाभाविकच पहिली पायरी ही धार्मिक विधींसाठी आकृती काढणे ही होय. इथे रुंदी आणि लांबी 'B' आणि 'L' ह्या धार्मिक विधीच्या आकृतीप्रमाणे आणि शुभ आयादि प्रमाणे ठरवितात. Bruno Dejans नी लक्षात घेतले की भाग 'B' (रुंदी) हे एक महत्त्वाचे माप आहे. ते चौकोनाची एक बाजू दाखवते. त्याच वेळी आकृतीचे चौकोन तयार होतात. ते एकतर मूळच्या रेषेमुळे तयार होतात (प्रमाण आणि पर्यंत) किंवा आकृतीच्या मदतीने किंवा ह्या दोन्ही मार्गाने कदाचित स्तंभाच्या जागा, स्तंभातील अंतर आणि risalities दाखवतात. इथे एक प्रश्न उद्‌भवतो तो असा - यांपैकी कोणते मूलमापन प्रथम येते? रुंदी 'B' का स्तंभातील अंतर म्हणजे 'M', 'D' आणि 'h'? माझ्या मते दोन्ही पर्याय शक्य आहेत. वर दिलेल्या पर्यायी पद्धतींपैकी पहिली (a) देऊळ आणि गोपूर ह्याला योग्य आहेत. आणि नंतरचे (b) मंडप, दिवाणखाने, सज्जा, गच्ची आणि घरांसाठी योग्य आहेत. देऊळ आणि गोपूर यांच्या बाबतीत स्तंभ हा आलंकारिक भाग असतो. मागच्या भिंती त्या वरच्या बांधकामाचे वजन पेलतात. दुसऱ्या बाजूला स्तंभ हा त्याच्या entablature बरोबर एक महत्त्वाची भूमिका इमारती, मंडप आणि सज्जा ह्यांचा भार संभाळतो.

देवळांच्या उंचीच्या रचनेतील तपशिलामधील मूलमापन 'D' त्याच्या शक्यतेबद्दल शंका घेऊ शकेल पण

इथे असे दिसते की मूलमापन 'B' आणि 'M' दुय्यम ठरतात. entablature आणि attic च्या तपशीलाकरता मूलमापन 'D' महत्त्वाचे ठरते. बांधकामाच्या अगोदर मूलमापन 'B' 'M' आणि 'D' हे निश्चित करायला हवेत. देवळामध्ये रुंदी 'B' ही दोन स्तंभांतील अंतर 'M' हे निश्चित विषम संख्येमध्ये विभागून ह्या खांबाची जाडी 'D' ही सम किंवा विषम संख्येशी जुळवून घ्यावी. इथे दोन्हीतील सख्य म्हणजे स्तंभाची उंची 'h' ही संपूर्ण उंची 'H' आणि भाग 'P' वर अवलंबून आहे. दोन्ही सर्वमान्य प्रमाणांवरून मूलमापन 'B' ठरवता येतात. दोन मुळातच वेगळी असलेली मूलपरिमाणे त्यांच्या वापराविषयी जे गृहीतक धरले आहे त्याला 'मयमत' हे पुष्टीच देते. जर बांधणीची मापे रुंदी 'B' वरून ठरविली तर ही योजना दोन स्तंभातील अंतराविषयी फारच कमी लवचीकता देते. दुसऱ्या पक्षी स्तंभ आणि दोन स्तंभांतील अंतर ह्यांचे सापेक्ष प्रमाण हे लिखाणात दिलेल्या सूचनेनुसार निश्चित केले तर संपूर्ण उंची 'H' रुंदी 'B' च्या संदर्भातून सर्वमान्य प्रमाण 'N' हे स्वीकारणे अशक्य असल्याचे दिसते. काहीसे वरच्या स्तराचे उंचीची मापे ह्यांची सर्वमान्य प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या स्तंभाच्या उंचीशी जुळणारी असावीत. परंतु सर्वमान्य प्रमाण 'n' आणि 'N' ही खात्रीने एकमेकांशी विरुद्ध आहेत. माझ्या मते ती निरनिराळ्या इमारतींचे प्रकार दर्शविता.

दुसऱ्या बाजूला रचनेसाठीच्या पद्धती ज्या त्या काळी प्रचलित होत्या आणि त्यांचे संस्कृत ग्रंथांशी काय संबंध होते हे शोधायचे म्हटले तर मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या दक्षिण भारतीय इमारती, देवळे, मंडप, गोपूर आणि निवासी घरे ह्या सर्वांची मोजदाद करणे आणि त्यांचे सूक्ष्म परीक्षण करणे हे जरूरीचे आहे.

### उपसंहार

व्हिट्रुव्हिअस आणि मयमत ह्या दोघांच्या मूलमापन पद्धती ह्या अंशतः आदर्शवादी आणि काल्पनिक आणि अंशतः जे स्थापत्यशास्त्रीय पुरावे उजेडात आलेले आहेत आणि व्यावहारिकदृष्ट्या विचार करणे प्रसंगोचित ठरेल. दोन्ही ग्रंथांतून एक सुसंगत मूलमापन पद्धती निर्माण केली गेली असल्याचे लक्षात येते. व्हिट्रुव्हिअसचे सिद्धान्त हे साधारणपणे बांधकामाच्या जागेवर कृती करण्यासाठी काही अमूर्त संकल्पना देतात. त्या कल्पना रचनेसंबंधी आहेत. विशेषतः Ordinatio आणि dispositio आणि त्याचा उद्देश eurythmia आणि symentria हा आहे. व्हिट्रुव्हिअसच्या मूलमापनाचा D/T आणि त्याचा सांख्यिक गुणक एक हा आहे. त्याचा उपयोग आणि वापर हा रचनेच्या कृतीचा एक भाग बनतो. तसेच कंपास आणि setsquare ह्यांच्या मदतीने आरेखन करण्यात उपयोग होतो. व्हिट्रुव्हिअस रोमन फूटचे अपूर्णांकात निश्चित परिमाण देत नाही. (Uncal किंवा Digital) रोमन फूटचा वापर त्या वेळी इतक्या प्रमाणात होत असावा की व्हिट्रुव्हिअसला त्याचा विचारच करावासा वाटला नसावा. त्याची मूलमापनाची भूमिका प्राथमिक आणि महत्त्वाची वाटली. कारण 'सर्व' मापने ही त्यापासून काढली जात होती. प्रत्यक्षात हे सुरुवातीची आरेखने आणि गणिते केल्याशिवाय म्हणजेच वर उल्लेखिलेल्या रचनेच्या कृतिशिवाय घडत नाही.

**हेन्री शिल्ड,** हेलसिंकी विद्यापीठ आशियाई व आफ्रिकी अभ्यास विभाग

**अनुवाद : अरविंद फडणीस**
**व डॉ. प्रभाकर आपटे**

२/४ दामोदर सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.
दूरभाष - (०२०)२४४१२३८७

●●●

# ''संस्कृत कथावाङ्मयाला लाभलेले प्रा. मिशेल हान यांचे योगदान''

*प्रा. मायकेल हान या जर्मनीस्थित संस्कृत विद्वानाचे २१ जुलै रोजी निधन झाले. जर्मनी येथील फिलिप्स विद्यापीठात संस्कृत व भारतविद्येचे मानद प्राध्यापक राहिलेल्या प्रा. हान यांचे संस्कृतमध्ये लिहिलेल्या बौद्ध कथनात्म साहित्यावर मूलगामी चिंतन होते. पुणे येथील डॉ. श्रीकांत बहुलकरांनी प्रा. हान यांच्या निधनाची बातमी मा. संपादकांना कळवली. डॉ. श्रीकांत बहुलकरांनी प्रा. हान यांना संशोधनादरम्यान मोलाचे सहकार्य केले आहे. प्रा. हान यांच्या संशोधनक्षेत्रातील भगीरथ प्रयत्नांवर प्रकाश टाकणारा हा विशेष लेख. प्रस्तुत लेख डॉ. बहुलकरांनी दिलेल्या माहितीवर आधारित आहे - संपादक*

ज्या देशामध्ये बुद्धधर्माचा उदय झाला त्याच भारतामध्ये बौद्ध कथावाङ्मय मूळ संस्कृतमध्ये उपलब्ध नसून ते तिबेटी, चिनी व मंगोलियन या भाषांमध्ये भाषांतरित झालेले उपलब्ध आहे. या वाङ्मयाचा उल्लेख केवळ धावत्या स्वरूपात संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात पाहायला मिळतो. 'नेपाळहृजर्मन हस्तलिखित संवर्धन प्रकल्पाचा' या कामी खूप उपयोग झाला. ही हस्तलिखिते नंतर भारत, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क व इटली या देशांमध्ये अभ्यासार्थ नेण्यात आली.

तिबेटमध्ये जेव्हा बुद्धधर्माचा प्रसार होण्यास सुरुवात झाली तेव्हा भारतातून अनेक हस्तलिखिते नेऊन त्यांचे तेथील अनेक बुद्धविहारांमध्ये संवर्धन झाले आहे. परंतु अनेक मूळ हस्तलिखिते ही चिनी सरकारच्या ताब्यात असल्याने अभ्यासकांना ती मिळत नाहीत. पंडित राहुल सांकृत्यायन यांनी १९३० साली केलेल्या तिबेटच्या चार अभ्यासदौऱ्यांमध्ये या हस्तलिखितांचे छायाचित्राण केले असून सुदैवाने हा ज्ञानाचा ठेवा पाटणा येथे अभ्यासकांना उपलब्ध झाला आहे.

संस्कृत व प्राच्यविद्येच्या संशोधकांना हे ज्ञात आहे की, संस्कृत साहित्याच्या इतिहासाचा अभ्यास करताना अनेक बौद्ध लेखकांनी संस्कृतमध्ये लिहिलेल्या अनेक कृती दृग्गोचर होतात. ही काव्ये संस्कृत काव्यशास्त्रातील सर्व निकषांची पूर्ती करतात. उदाहरणार्थ अश्वघोषाने लिहिलेले संस्कृत महाकाव्य 'बुद्धचरित' व 'सौन्दरानन्द' तसेच 'सारिपुत्रप्रकरण' हे नाटक. हर्षाचे 'नागानंद' नाटक, आर्यसुरींची 'जातकमाला' व क्षेमेंद्राची 'बोधिसत्त्वदानकल्पलता'. या वाङ्मयाचा केवळ उल्लेख होतो मात्र भारतीय विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमात समावेश होत नाही. परिणामी केवळ कालिदास, भास, बाणभट्टादी संस्कृत (महाकवींच्या) लेखकांच्या कृतींचा अभ्यास होतो आणि संस्कृत बौद्ध कथावाङ्मयाकडे दुर्लक्ष होते. नेमके हेच हेरून प्रा. हान यांनी अभ्यासकांसाठी 'संस्कृत भाषेत लिहिल्या गेलेल्या बौद्ध कथावाङ्मयाचे' दालन उभे केले व अविरत श्रमाने अनेक ग्रंथांचा शोध लावला.

प्रा. हान हे जर्मनीतील फिलिप्स विद्यापीठात संस्कृत व भारतविद्येचे मानद प्राध्यापक असून अभिजात भाषांमध्ये असलेल्या गतीमुळे भारत व संस्कृत भाषेच्या अभ्यासाकडे प्रवृत्त झाले. त्यांची ग्रीक व लॅटिन या भाषांवर विलक्षण पकड आहे. पदव्युत्तर शिक्षण घेताना संस्कृत, तिबेटी व मंगोलियन या तीनही भाषांचा अभ्यास केल्यामुळे 'महायान' वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास सुकर झाला (पीएच.डी.). विद्यावाचस्पती पदवीसाठी 'तिबेटियन त्रिपिटकाचा' अभ्यास करताना त्यांना असे निदर्शनास आले की त्रिपिटकात सुमारे ५५०० च्या वर बौद्ध ग्रंथांचा अंतर्भाव असून त्यांत तत्त्वज्ञान, काव्य, व्याकरण, वृत्त,

ज्योतिष, आयुर्वेदादी ग्रंथांचा समावेश आहे. या संशोधनादरम्यान प्रा. हान यांना बौद्ध विद्वान ज्ञानश्रीमित्रांच्या 'वृत्तमालास्तुती' या संस्कृत छंदशास्त्रीय ग्रंथाचा शोध लागला. या ग्रंथाचा उल्लेख पूर्वी कुठेही आढळत नाही.

वृत्तमालास्तुती हा ग्रंथ ज्ञानश्रीमित्रांनी संस्कृत भाषेतील १५० वृत्ते वापरून लिहिला आहे. यावरुन त्यांची संस्कृत छंदोविज्ञानातली गती लक्षात येते. मात्र या ग्रंथाचे केवळ तिबेटी भाषेतील भाषांतरच उपलब्ध असल्यामुळे प्रा. हान यांना विशेष मेहनत घ्यावी लागली. या ग्रंथाची एक हस्तलिखित टीका नेपाळमध्ये उपलब्ध झाल्यामुळे प्रा. हान यांनी या ग्रंथाचे तिबेटी भाषांतर व टीकेचा अभ्यास करून मूळ ग्रंथ संस्कृतमध्ये सिद्ध केला. हे फार मोठे योगदान प्रा. हान यांनी संस्कृत भाषेच्या वृत्तशास्त्राला दिले आहे. यामधून त्यांची स्वतःची संस्कृत भाषेवरव असलेली विलक्षण पकड लक्षात येते. त्याचे एक उदाहरण पाहू. 'मेघविस्फूर्जित' हा शब्द भाषांतरीत करताना यातील श्लेष अलंकार प्रा. हान यांनी उलगडून दाखवला आहे.

मेघविस्फूर्जित म्हणजे मेघ + विस्फूर्जित ह्न मेघांचा गडगडाट तर दुसरा श्लेषार्थ मे + अघविस्फूर्जित म्हणजे माझ्या पापांचे दृश्य स्वरूप.

संस्कृत साहित्याच्या इतिहासात वृत्तमालास्तुती या ग्रंथाचा उल्लेख नाही. अनेक बौद्ध विद्वानांनी रचलेले हे मूळ ग्रंथ संस्कृतमध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा केवळ तिबेटी अनुवाद उपलब्ध आहे. संस्कृत छंदशास्त्रात या बौद्धग्रंथामुळे (वृत्तमालास्तुती) गुणात्मक भर पडली आहे. प्रा. हान यांनी या खजिन्याचा शोध लावून खऱ्या अर्थाने संस्कृत साहित्याला समृद्ध केले आहे.

प्रा. हान यांची संस्कृत भाषेची जाण विलक्षण प्रगल्भ आहे. एका हस्तलिखितात उपलब्ध झालेल्या अत्यंत अस्पष्ट अशा श्लोकाचा योग्य अन्वय लावून त्यांनी हे सिद्ध करून दाखवले. त्याचे एकच उदाहरण पुरेसे आहे ते असे. गिलगिट हस्तलिखित -

'भवान् ख्यातः क्षितीतले सर्वतः (सर्वदः) करुणात्मकः ।
यथा शिबी श्रुतो नित्यः तथा त्वम् कर्तुमर्हसि ॥
यथासि विश्रुतो नित्यः तथा त्वम् कर्तुमर्हसि ।

एका ब्राम्हणाने विश्वांतर राजाची स्तुती केली व त्याला शिबीराजाच्या तोडीचा असल्याचे म्हटले. 'हे राजा, तू पृथ्वीतलावर परमकारुणिक म्हणून प्रसिद्ध आहेत आणि तू शिबीराजासारखा वागतोस.' या भाषांतराचा अभ्यास करताना प्रा. हान यांना कळले की करुणेचा व शिबीचा संबंध नसून त्याच्या औदार्याशी संबंध आहे. तसेच हे भाषांतर तिबेटी भाषांतराशी जुळत नव्हते म्हणून प्रा. हान यांनी 'श्रू' धातूचा उपयोग अभिजात वाङ्मयात कसा होतो हे पाहिले. त्यांना असे लक्षात आले की 'यथा शिबी श्रुतो नित्यः' नसून 'यथासि विश्रुतो नित्यः असे आहे व सर्वतः नसून 'सर्वदः' (सर्वं ददाति इतिह्नउपपद तत्पुरुष समास) असे आहे. अभ्यासांती प्रा. हान यांनी खालिलप्रमाणे भाषांतर केले.

'हे राजा, तू या जगात कारुणिक व सर्वस्वाचं दान करणारा आहेस. तू ज्याच्यासाठी (विश्रुत) प्रसिद्ध आहेस तसेच वागशील.'

विसाव्या शतकापर्यंत उपलब्ध झालेल्या हस्तालिखितांचा व एकूण संशोधनसाहित्याचा अभ्यास केल्यानंतर प्रा. हान हे खालील दोन निष्कर्षांप्रत पोचले.

१) बहुतांश किंवा सर्वच अभिजात संस्कृत साहित्याची प्रातिनिधिक उदाहरणे बौद्ध साहित्यात सापडतात.

२) बौद्ध कथावाङ्मयात अशा अनेक काव्यप्रकारांचा अंतर्भाव आहे ज्यांचा संस्कृत अलंकारशास्त्रज्ञांनी व सैद्धान्तिकांनी उल्लेख केलेला नाही.

भामहाच्या ‘काव्यालंकार’ ग्रंथात तर दण्डीच्या ‘काव्यादर्शात’ काही काव्यप्रकारांचा अत्यंत धावता उल्लेख (cursory glance) आहे. परंतु तिबेटियन तेंग्यूर संप्रदायातील ग्रंथात काव्यप्रकारांचा, वृत्तशास्त्रीय बारकाव्यांचा अत्यंत विस्ताराने उल्लेख आहे. प्रा. हान यांनी अभ्यासांती काव्यप्रकारांचे विस्ताराने वर्गीकरण केले असून गद्य, पद्य व संकीर्ण असे मुख्य भाग केले आहेत. त्यात ‘जातकमाला’ हा संपूर्णतः नवीन प्रकार अंतभूत आहे.

जर्मनीमध्ये संस्कृत बौद्ध कथावाङ्मयाचा अभ्यास कधीच एवढ्या मोठ्या प्रमाणात झाला नाही. जे विद्वान संस्कृत कथासाहित्याचा अभ्यास करतात ते बौद्ध कथावाङ्मयाकडे वळत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये प्रा. हान यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. प्रा. हान यांनी भाषांतरित व संशोधित केलेल्या काही उत्कृष्ट कृतींचा गोषवारा थोडक्यात अभ्यासू या.

१. **कपिलाभ्युदय** ह्न शिवस्वामिन् या इसवी सनाच्या ९ व्या शतकातल्या काश्मीर शैव संप्रदायातील कवीच्या या ग्रंथाचा अभ्यास. बुद्धाच्या जीवनातील एका कथानकावर आधारित असलेल्या या उत्कृष्ट काव्याचे वाचन करताना संस्कृत व्याकरण, संस्कृत वृत्तशास्त्र व शास्त्रांचा अभ्यास या गोष्टींची गरज भासते. अर्थात या सर्व गोष्टींचे मूलगामी चिंतन असलेली व्यक्तीच या ग्रंथाला सिद्ध करू शकते.

२. **जातकमाला ह्न** हरिभाण व गोपदत्त या दोन बौद्ध विद्वानांनी लिहिलेल्या ग्रंथाचा उल्लेख पूर्वी कोठेच आढळत नाही. आर्यसूरींनी लिहिलेला ‘जातकमाला’ ग्रंथ हाच एकमेव समजला जात होता. प्रा. हान यांनी अशा अनेक ‘जातकमाला’ शोधून भाषांतरित, संशोधित केल्या.

३. लोकानंदनाटक ह्न चंद्रगोमिन् या बौद्ध विद्वानाने लिहिलेला ग्रंथ प्रा. हान यांनी अनेक हस्तलिखितांच्या अभ्यासांती सिद्ध केला. चंद्रगोमिन् हा व्याकरणाच्या ‘चांद्र’ संप्रदायातील असून बौद्ध विद्वान आहे. पूर्वी अश्वघोषाचे ‘शरद्वतीपुत्रप्रकरण’ हे नाटकच सर्वांत प्राचीन समजले जात असे. ‘लोकानंदनाटक’ ग्रंथाने ही समजूत खोटी ठरवली.

मागच्या शतकात पाश्चात्त्य देशांत विशेषतः जपानमध्ये संस्कृत बौद्ध कथावाङ्मयाचा शोध लागला. दुर्दैवाने भारतीय विद्वानांना याची माहिती नाही. या ग्रंथाच्या अभ्यासाने अभिजात संस्कृत वाङ्मयातच वृद्धी होणार असून प्रा. हान हे याचा प्रचार-प्रसार करणे हे कर्तव्य समजतात. वयाच्या ७४ व्या वर्षीदेखील त्यांचा उत्साह तरुण अभ्यासकांनाही लाजवणारा असा आहे.

‘संक्षेपसारिका’ या ग्रंथातील एक श्लोक उद्धृत करून श्री. बहुलकर प्रा. हान यांचे कृतज्ञ स्मरण करतात.

गुरुचरणसरोजसन्निधानाद् वयमपि तस्य गुणौकलेषभाजम्।
अपि महति जलराशे निमग्नः सलिलम् उपददते मितः हि मीनः॥

अर्थात ज्याप्रमाणे प्रचंड मोठ्या सागरामध्ये राहणारा मासा आपल्या तोंडात थोडेच पाणी घेऊ शकतो, तसे गुरूच्या चरणकमलाच्या सान्निध्यात बसून गुरूच्या गुणांचा काही अंश तरी अंगभूत करावा हा शिष्याचा मानस असतो.

प्रा. हान यांच्या भगीरथ प्रयत्नांचे संस्कृत साहित्याला जे योगदान लाभत आहे त्याने देववाणी निःसंशय समृद्ध होत आहे. तसेच तरुण संशोधकांसाठी प्रा. हान खऱ्या अर्थाने प्रेरणास्थान आहेत.

इति शम्.

**प्रशांत पु. धर्माधिकारी**

●●●

# द्वारका व्हाया पोरबंदर ते सोमनाथ - एक अनोखी यात्रा

*'द्वारका व्हाया पोरबंदर ते सोमनाथ' या स्थळांचे प्रवास वर्णन करणारा लेख - संपादक*

दर वर्षीप्रमाणे सन २०१३ च्या डिसेंबरला आमच्या ब्राम्हण मंडळाची सहल बारा ज्योतिर्लिंगांपैकी गुजरात राज्यातील सोरटी सोमनाथ आणि श्रीकृष्णाची भूमी द्वारका या ठिकाणी गेली होती. 'पोरबंदर' राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मस्थान आणि श्रीकृष्णावर अत्यंत प्रेम करणारा 'सुदामा' यामुळे आम्ही त्या स्थळालाही भेट दिली. द्वारका, पोरबंदर आणि सोरटी सोमनाथ ही तिन्ही ठिकाणे गुजरात राज्यात येतात. आमच्या ब्राम्हण मंडळाचे प्रमुख माजी प्राचार्य श्री. एस. एस. मुजुमदार सरांनी या तिन्ही ठिकाणांना भेटी द्यायच्या व सभोवतालची काय काय प्रसिद्ध ठिकाणे असतील ती पाहणे व माहिती करून घेणे असा संकल्प केला आणि त्यानुसार नियोजन केले.

दि. २४ डिसेंबर २०१३ ला आम्ही सदस्य दुपारी १.४५ च्या दक्षिणेकडून येणाऱ्या हाप्पा एक्सप्रेसने पनवेल येथून निघालो. आम्हां सदस्यांमध्ये मी स्वतः, ब्राम्हण मंडळाचे प्रमुख आदरणीय मुजुमदार सर, आर्थिक बाजू सांभाळणारे श्री. आर. डी. बोरुडे, श्री. एस. एल. खाचणे, श्री. आर. बी. केरकर, श्री. एच. आर. दंडवते, श्री. सी. व्ही. धुमाळ, श्री. एस. एन. बारगोडे, श्री. एस. एस. साटले इत्यादी सदस्य सहभागी झाले होते. हाप्पा एक्सप्रेस पनवेल येथून वेळेवर सुटली. सुरत, अहमदाबाद, राजकोट अशा प्रमुख स्थानक मार्गावरून शेवटी ती हाप्पा येथे जाते. आम्ही मंडळी राजकोट येथे पहाटे दि. २५.१२.२०१३ रोजी उतरलो. उतरल्यानंतर गरम गरम चहा प्यायलो. थंडीची तीव्रता थोडी कमी झाली. बुक केलेल्या व्हॅनचा ड्रायव्हर आमची वाट पाहतच होता. त्याच्याशी संपर्क साधला आणि गाडीत सामान टाकून आम्ही त्या गाडीने राजकोटपासून २४० किमी. अंतरावर असलेल्या द्वारका येथे निघालो. द्वारकेत दुपारी १.०० च्या दरम्यान पोहोचलो. द्वारकेत भद्रकाली धर्मशाळेत वास्तव्य केले. अर्धा ते एक तास थोडी विश्रांती घेऊन दुपारी २.०० वाजता द्वारकाधीशाच्या दर्शनासाठी बाहेर पडलो.

गोमती नदी अरबी समुद्राला ज्या ठिकाणी मिळते त्या पवित्र संगमावरच श्रीकृष्णाचे भव्य मंदिर आहे. ते दृश्य फार विलोभनीय आहे. आम्ही मंडळींनी गोमतीमाईचे दर्शन घेतले आणि द्वारकाधीशाच्या दर्शनासाठी गेलो. मंदिराची माहिती देणारा तेथील एक मिसरूड न फुटलेला पुजारी सोबत होता. तो आम्हांला माहिती देत होता. आम्ही रांगेत उभे राहिलो. रांग पुढे ह्व पुढे सरकत होती तसतसे आम्ही द्वारकाधीशाच्या जवळ जात होतो. प्रत्यक्ष द्वारकाधीशाच्या दर्शनाने धन्य वाटले. श्रीकृष्णाच्या ती कृष्णवर्णीय मूर्तीने डोळ्यांचे पारणे फेडले. सभोवतलच्या देवदेवतांची दर्शने घेतली. द्वारका हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. श्रीकृष्णाचा जन्म मथुरेत झाला असला तरी द्वारकेत त्याने राज्य केले. त्यामुळे द्वारका ही श्रीकृष्णाची कर्मभूमी आहे. द्वार म्हणजे दरवाजा. त्यावरूनच या शहराला द्वारका हे नाव पडले. या ठिकाणी दोन द्वारे असून त्यांपैकी एक स्वर्गद्वार व दुसरे मोक्षद्वार. स्वर्गद्वारातून प्रवेश आणि मोक्षद्वारातून बाहेर पडायचे. हिंदू धर्मियांचे हे अतिशय पवित्र ठिकाण आहे. चार धामांपैकी द्वारका एक धाम आहे. ह्या अगोदर आम्ही मंडळी रामेश्वर या ठिकाणी जाऊन आलो होतो. द्वारकेचा राजा कृष्ण म्हणून ह्या नागरीला द्वारकाधीश

असे म्हणतात. मंदिराच्या कळसावर असलेला ध्वज दिवसातून पाच वेळ बदलला जातो.

मंदिराच्या सभोवती श्रीकृष्णाचा पिता वसुदेव, माता देवकी, बलराम, रेवती, सुभद्रा, रुक्मिणी, सत्यभामा, जांबद यांची मंदिरे आहेत. आम्ही मंडळी मंदिर परिसर आणि सभोवताली पसरलेल्या अथांग सागरकिनाऱ्यावर फिरलो. आठवण म्हणून बरीच छायाचित्रे काढून घेतली. दुपारी ३.०० वाजता गुजराती रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतले. रूमवर थोडा वेळ विश्रांती घेतली आणि परत गाडीने नागेश्वर महादेव, गोपी तलाव आणि द्वारकाबेट इत्यादी सभोवतालची स्थळे पाहण्यासाठी निघालो. नागेश्वर महादेव आणि गोपी तलाव पाहून द्वारकाबेटकडे निघालो. द्वारकाबेटला जाण्यासाठी बोटीने गेलो. श्रीकृष्णाचा भक्त सुदामा ज्या ठिकाणी श्रीकृष्णास भेटला त्या स्थळाला द्वारकाबेट असे म्हणतात. द्वारका आणि द्वारकाबेट या दोन्ही स्थळांना सारखेच महत्त्व आहे. त्या दिवशी आम्ही मंडळींनी द्वारकेतच मुक्काम केला. सकाळी लवकर उठलो. परत श्रीकृष्णदर्शन घेतले. तो दिवस होता २६.१२.२०१३ चा. सकाळी ९.०० वाजता आम्ही पोरबंदरकडे निघाले. गाडीच्या ड्रायव्हरने आम्हांला वाटेत मंदिरे आणि काटी प्रेक्षणीय स्थळे दाखविली, की जी त्याला माहीत होती. पोरबंदरला आम्ही ठीक ११.०० वाजता पोहोचलो. गाडी योग्य जागी पार्क करून आम्ही गांधी मेमोरिअल हाउस पाहण्यासाठी रिक्षाने गेलो. पारतंत्र्याच्या जोखडातून भारतभूमीला मुक्त करण्यासाठी अहिंसक मार्गाने लढा देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे हे जन्मस्थळ म्हणजेच पोरबंदर. तिथले संग्रहालय इतिहासकारांनाच नाही तर स्थानिक लोकांना आणि पर्यटकांनाही आकर्षित करते. आम्ही मंडळींनी गांधी मेमोरिअलमध्ये गांधींच्या वस्तू, चश्मा इत्यादी पाहिल्या. पोरबंदर शहरात सुदाम्याचे मंदिर आहे, तेही पाहिले, मंदिराची कलाकृती, कृष्ण-सुदामा भेटीची आकर्षक चित्रे इत्यादी पाहिले. पोह्यांचा प्रसाद घेतला.

पोरबंदर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर आहे. शिवाय विमान आणि रेल्वेने जोडलेले प्रमुख शहर आहे. जवळजवळ दीड-दोन तास आम्ही पोरबंदरमध्ये घालविले दुपारी तेथेच एका रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतले आणि पुढील प्रवासासाठी आम्ही सोरटी सोमनाथाकडे निघालो.

सोरटी सोमनाथाकडे जाताना वाटेत काही प्रमुख मंदिरे पाहिली. त्यांमध्ये भालका मंदिर होते. काही वेळ चौपाटीवर थांबलो. वाटेतच भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींमध्ये गणना केली जाते अशा अंबानी बंधूचे गाव चोरघड दिसले.

सोरटी सोमनाथ येथे आम्ही मंडळी जवळजवळ ६.०० वाजता पोहोचलो. सोमनाथ ट्रस्टच्या अहिल्याबाई होळकर धर्मशाळेत उतरलो. हा आमच्या सहलीतील आकर्षक आणि शेवटचा टप्पा. वेरावळ शहरापासून पाच किलोमीटरवर सोमनाथचे जगप्रसिद्ध मंदिर आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक प्रमुख स्थान. इथल्या महादेवाची भव्य पिंडी, कलाकुसरीने नटलेले आवार, मागे अथांग समुद्र.

मोहम्मद गजनी याने मंदिराचा भंग केल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कारकिर्दीत मंदिराचा जीर्णोद्वार केला गेला. त्यामुळेच या मंदिरास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

आम्ही मंडही हात पाय स्वच्छ करून सोरटी सोमनाथच्या दर्शनाला गेलो. मंदिर परिसर स्वच्छ होता. चोख सुविधा होती. सायंकाळी ७.०० वाजता आरती होती. आरती झाल्यानंतर Music Light Show मंदिराच्या पाठीमागे होता तो पाहिला. नंतर जेवण करून आम्ही रूमवर येऊन झोपलो.

दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २७.१२.२०१३ रोजी सकाळी लवकर उठलो आणि तयार होऊन परत सकाळी सोमनाथ दर्शनाला गेलो. दर्शन छान झाले. आम्ही

मंडळींनी अभिषेक करून घेतला आणि जवळ संगम पाहण्यासाठी गेलो. त्यानंतर ठीक ११.०० वाजता सोरटी सोमनाथहून आम्ही परतीच्या मार्गाला लागलो.

वाटेतच प्रसिद्ध गीर अभयारण्य पाहिले. ते सिंहांसाठी प्रसिद्ध आहे. थोडा वेळ अभयारण्यातच फेरफटका मारला. दुपारचे १२ ते १२.३० वाजले होते. पुढे जाऊन मध्येच जेवणासाठी थांबलो. त्यानंतर गोवर्धन पर्वत या ठिकाणी गेलो. श्री. दत्तगुरुचे प्रसिद्ध जागृत स्थान आहे. १०,००० पायऱ्या चढून पर्वत शिखरावर मंदिर आहे त्या ठिकाणी आम्ही मंडळीनी पायथ्याखालूनच श्री. दत्तगुरुंना नमस्कार केला. दुपारचे ४.०० वाजले होते. तेथून पुढे आम्ही प्रसिद्ध रामभक्त जलारामबापूंचे दर्शन घेतले. सिद्धपुरुष रामभक्त जलारामबापूंच्या दर्शनाने आमच्या सहलीतील सदस्यांना खूप धन्य वाटले. आम्ही मंडळी नंतर पुढे ब्राम्हणमंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. खाचणेसर यांच्या बंधूकडे राजकोट येथे मुक्कामी आलो. आमच्या जेवणाची आणि राहण्याची उत्तम सोय श्री. खाचणे यांनी केली होती. दुसऱ्या दिवशी दि. २८.१२.२०१३ रोजी सकाळी ७.०० वाजता दादर स्टेशनवर पोहोचलो.

ज्याप्रमाणे आम्ही मंडळीनी सहलीची आखणी केली त्याप्रमाणेच सर्व गोष्टी साध्य होत गेल्या. गुजरातमधील सौराष्ट्र हा पर्यटकांना फारसा परिचित नसलेला भाग; परंतु श्रीकृष्णाची द्वारका, महात्मा गांधींचे जन्मस्थळ पोरबंदर, सोमनाथाचे प्रसिद्ध शिवमंदिर आणि गीरचे अभयारण्य ही सर्व ठिकाणे प्रत्यक्ष पाहिली, माहिती करून घेतली आणि खरोखरच पर्यटकांना आकर्षून घेण्याची क्षमता त्यांमध्ये नक्कीच आहे असे मनोमन वाटले!

**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
ग्रंथालय ह्र साहाय्यक
वि.प्र. मंडळचे तंत्रनिकेतन
ठाणे ह्र ४०० ६०१.

(**नर्मदा परिक्रमा** मागील पृष्ठ ८ वरून)

स्नान झाले की जाणवतही नाही की दिवसभर वीस-बावीस-पंचवीस किलोमीटरची चाल झाली आहे.

अधिभौतिक, अधिदैविक, अध्यात्मिक असा कोणताही ताप नाही. येण्यापूर्वी घसा बसला होता, दोन-तीन महिने कोणत्याही उपायांना दाद देत नव्हता, तो सुटला.

प्रोस्टेट त्रासामुळे रात्री दोन-तीन वेळा लघुशंकेसाठी उठावे लागे. सध्या रात्री/पहाटे एकदाच उठावे लागतेय.

वर्षभर त्रास देणारी जांघेतील कंड अजिबात नाही. नाहीतर FASE 150 या औषधाचा मला वारंवार उपयोग करावा लागत होता. कोर्स पुरा झाल्यावरही महिन्यातून एकदा गोळी घ्यावी लागे.

घसा सुटण्यासाठी डॉ. रत्नाकरांनी होमिओपॅथी औषध दिले होते ते बरोबर आणले आहे. डबा उघल्यावर दिसले तर चार गोळ्या घेतो, पण असे आजपर्यंत २-३ वेळाच झाले आहे.

मुण्डन क्षौर केल्यावर चेहरा बिनओळखीचा झाला होता. त्याच दिवशी धर्मशाळेत (गजानन म.) आरसा पाहिला तर भयावह वाटला. थेरड्याचा चेहरा ! मुळात मी दिसायला असाच आहे हे त्यातून कळलेले कटू सत्य !

आता मात्र दाढी पाऊण महिन्याची आहे. केस जेमतेम असले तरी डोक्याला आकार देतात. अधूनमधून फोटो घेत आहोत त्यांत हा फरक दिसेल.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

## मूल्यवेध-०१
# विश्व स्वधर्मसूर्ये पाहो

*मानवी अनुभवाचा सर्वाधिक कालखंड लाभलेले क्षेत्र भारत हेच आहे, हे विशद करणारा लेख - संपादक*

खूप खूप वर्षांपूर्वी मानवी जीवन हे पृथ्वीच्या सीमित भूभागावरच स्थिरावलेले होते. उपजीविकेच्या शोधात मानवाने मग नवनव्या भूप्रदेशांचा शोध घेतला. कालांतराने सबंध पृथ्वीचा शोध लागला. आज पृथ्वीवरचे बहुतेक सर्व भूभाग, त्यांवरील चराचरांसह ज्ञात झालेले आहेत.

ज्या काळी मानवी जीवन हे पृथ्वीच्या सीमित भूभागावरच स्थिरावलेले होते, तेव्हा आपले पूर्वज उत्तरेला असलेल्या हिमालय पर्वतापासून तर दक्षिणेला असलेल्या हिंदी महासागरापर्यंतच पृथ्वीचा सर्व विस्तार असल्याचे मानत असत. राजा भरत ह्या प्रदेशावर राज्य करत असे, म्हणून ह्या भूभागास भारत असे म्हटले जाई आणि त्यात वास्तव्य करणाऱ्या लोकांना भारती म्हणजे भरत राजाचे प्रजाजन म्हटले जाई.

**उत्तरं यत्‌ समुद्रस्य हिमाद्रैश्चैव दक्षिणम्‌ ।**
**वर्षं तत्‌ भारतं नाम भारती यत्र संततिः ।।**
- विष्णुपुराण (अंश-२, अध्याय-३, श्लोक-१)

आज पृथ्वीवरील सर्व मनुष्यवसाहतींत सर्वांत पुरातन संस्कृती भरतखंडात नांदत आहे. त्यामुळेच आज मानवी अनुभवाचा सर्वाधिक कालखंड लाभलेले क्षेत्र भारत हेच आहे. इजिप्त, ग्रीस, चीन यांसारख्या देशांतही अनेक पुरातन संस्कृती अस्तित्वात आहेत. मात्र त्या देशांतील संस्कृतींनी जपलेल्या मानवी-अनुभवलेखनाच्या पद्धती आपल्याइतक्या समृद्ध नाहीत. म्हणूनच आज आपल्या संस्कृतीस कालांतरापासूनचे सर्व ज्ञान, निरंतर आणि अखंडित स्वरूपात सांभाळून ठेवण्यात देदीप्यमान यश लाभलेले आहे. कसे ते आपण पाहू या.

भारतात जीवनातील सर्व अनुभवांचे वर्णन करण्यास समर्थ अशा भाषेचा विकास झाला. संस्कृतीसोबतच विकसित होत गेली ती संस्कृत भाषा. मात्र त्या काळी लिहिण्याची माध्यमे सीमित असत. भूर्जपत्रे, तालपत्रे ह्यांचा वापर अनुभवलेखनार्थ केला जाई. तरीही भारतीयांनी सर्व अनुभव सूत्ररूपांनी जपण्याचे धोरण ठेवले. अनुभवाचे सार सूत्ररूपे लिहिले जाई. मात्र पिढ्या-दर-पिढ्या वंशसातत्याने ते ज्ञान टिकून राहावे ह्यासाठी मुद्रित, लिखित, नाशवंत माध्यमांचा वापर न करता, गेयश सूत्रांत बद्ध केलेले ते अनुभवसार, मौखिक गुरुशिष्य-परंपरेने अभ्यासले, राखले, विकसित केले आणि हस्तांतरित केले जाई.

बळी तो कान पिळी ह्या नैसर्गिक न्यायास मनुष्याने बुद्धिसामर्थ्याच्या आधारे विफल ठरविले. एरव्ही अशक्त, दुर्बळ ठरणारा मनुष्य; त्याच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्याने इतर सर्व शक्तिमान प्राण्यांहूनही सरस ठरला. मात्र मनुष्या-मनुष्यांतील वैमनस्यांत दोन्हीही बाजूंच्या बुद्धिवैभवाने, दोन्हीही पक्षांचा निरंतर ऱ्हासच होत राहिला. ह्यावर उपाय म्हणून, परस्पर-सामंजस्याने मनुष्यमात्रांनी समाजशील राहून सृष्टीच्या निसर्गवैभवाचा आस्वाद घ्यावा, असा सुवर्णमध्य निघाला. सर्व मनुष्यांच्या एकत्रित बुद्धिमत्तेच्या तुलनेत एकट्या मनुष्याची बुद्धी तोकडी पडू लागली आणि मानवी सत्ता-साम्राज्यांचा उदय झाला. अशा साम्राज्यांत, प्रत्येक व्यक्तीने कशा प्रकारे यम-नियमांचे पालन केले असता सर्वांत इष्ट, सर्वजनपरितोषक, संपन्न जीवनमान साकारता येईल ह्याचा शोध मग सर्वच समाज घेत राहिले. व्यक्तींनी व्यक्तींपुरते आणि समाजाचा घटक म्हणून कसे

वागले असता सर्व प्राणिमात्रांचे कमाल हित साधले जाईल, त्या वर्तनास 'केवळ' वर्तन म्हटले जाऊ लागले. 'मुक्त' वर्तन मानले जाऊ लागले. असे जीवन जगण्याच्या संधीस मग 'कैवल्य' किंवा 'मोक्ष' प्राप्ती समजले जाऊ लागले. अशा कैवल्याची किंवा मोक्षाची उद्दिष्टे मग निश्चित करण्यात आली. काय होती ती उद्दिष्टे? आज असे निस्संशयपणे सांगता येईल की ती उद्दिष्टेः

**सर्वे सुखिः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित्‌ दुःखभाग भवेत्‌।।**

अशा शब्दांत बांधण्यात आलेली होती. ह्या शब्दांचा अर्थ असा आहे की, सर्व सजीव सुखी व्हावेत, सर्व सजीव निरामय जीवन जगू शकावेत, सर्व सजीव कुशल राहावेत, कुणासही दुःख वाट्याला येऊ नये. प्रत्येकाने ह्या उद्दिष्टांना मनात ठेवून त्या धोरणास सुसंगत वागल्यास असे जीवन प्रत्येकास खरेच साधता येईल, असाही विश्वास त्यामुळे निर्माण झाला.

आदर्शवत आचार कसा असावा ते सांगणारे आचारधर्म अस्तित्वात आले. ते न पाळल्यास मानवी सत्तांनी, ते न पाळणाऱ्यांस दंडनीय ठरवले. त्याकरता दंडसंहिता निर्माण झाल्या. दंडसंहितेत न लिहिलेल्या नियमांकरता नैतिकतेची बंधने घालून पापपुण्याच्या संकल्पना प्रचलित करण्यात आल्या. मात्र इथे तो विचार करायचा नसून, केवळ आदर्श मानवी आचरण कसे असावे ह्याबाबत आपल्या पुरातन संस्कृतीत जो शोध घेतला गेला आणि जे नवनीत त्यातून प्राप्त झाले त्याचाच विचार इथे करायचा आहे.

अनेक आचरणसूत्रांच्या समुच्चयाने संपन्न झालेल्या संहितेस मग योग म्हणू लागले. योगाचे वर्णन अष्टांगयोग असे केले जाऊ लागले. अष्टांगयोगानुसार वर्तन करत गेल्यास प्रत्येकासच कैवल्य म्हणजेच मोक्ष प्राप्त होऊ शकतो, अशा निष्कर्षांप्रत आपले पूर्वज आलेले दिसतात.

भारतीय ब्रम्हविद्येचे लेखन वेळोवेळी, सूत्ररूपे होतच राहिले. गीतेत कृष्णाने अर्जुनास केलेल्या उपदेशास व्यास मुनींनी शब्दबद्ध करून ठेवलेले आहे. गीतेतील अनुष्टुभ छंदात लिहिलेले ६९७ श्लोक, ब्रम्हविद्येचे सर्व सैद्धान्तिक पैलू सविस्तर उलगडून दाखवण्यास समर्थ आहेत. त्याचप्रमाणे पतंजली मुनींनी १९५ योगसूत्रांत लिहून ठेवलेली योगसूत्रे जीवनातील अनुभवसाराचे प्रात्यक्षिक पैलू शब्दबद्ध करतात. भारतीय संस्कृती सूत्ररूपात एवढीच काय ती आहे. मात्र सूत्रांत सांगितलेले वर्ण्य विषय, उत्तम भाषाज्ञानाशिवाय सहजी आकलनयोग्य राहत नाहीत. म्हणूनच त्यांच्या स्पष्टीकरणार्थ आपले वेद, आपली पुराणे, आपले योगशास्त्र इत्यादींची भर आपल्या संस्कृतीत सतत पडत गेली. ह्या सर्व संहितांत १४ विद्या आणि ६४ कलांनी संपन्न जनजीवनाची गुरुकिल्ली भारतीय समाजाने आजही मुख्यतः मौखिक परंपरेने सांभाळून ठेवलेली आहे.

पातंजल योगसूत्रांचे वर्णन योगाचार्य कृष्णाजी केशव कोल्हटकर ह्यांनी भारतीय मानसशास्त्र असेच केले आहे. पतंजली मुनींनी सूत्रबद्ध केलेला योग म्हणजेच अष्टांगयोग. अष्टांगयोगात कैवल्य म्हणजेच मोक्षप्राप्तीचा मार्ग; यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ह्या टप्प्यांनी प्रगत होतो; असे सांगितलेले आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रम्हचर्य हे पाच यम आहेत. शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे पाच नियम आहेत. दैनंदिन जीवनात यम-नियमांचे पालन करणे, अष्टांगयोगाचा महत्त्वाचा भाग आहे. अशा प्रकारे व्रतस्थ जीवन जगत असता करावयाच्या आसनांनाच हल्ली योग असे संबोधले जात असल्याने त्यांचे वर्णन वेगळे करण्याची आवश्यकता नाही.

मात्र इथे एवढेच नमूद करायला हवे की, योगासने ही सावकाशपणे, शरीरास कुठेही त्रास न होता, पण शरीराची प्रत्येक स्वायत्तता हळूहळू विकास पावत राहावी

अशा प्रेरणेने करायला हवीत. योगासनाच्या अंतिम स्थितीत काही मिनिटे टिकून राहता यायला हवे. सुमारे तासभर कुठलाही व्यायाम केल्याने रक्तदाब सुमारे १० मिलिमीटर पाऱ्याइतक्या प्रमाणात वाढत असतो, तर कुठलीही योगासने सुमारे तासभर केली असता रक्तदाब सुमारे मिलिमीटर पाऱ्योइतक्या प्रमाणात कमी होत असतो, असे प्रत्यक्षात आढळून आलेले आहे. आसनांचा उद्देश, समाधिसाधनार्थ एकाग्रताप्राप्तीसाठी, शरीर संपूर्ण शिथिल करून, इष्ट ते आसन दीर्घकाळ टिकवून धरण्याची क्षमता प्रस्थापित करण्याचा असायला हवा.

अशी क्षमता प्रस्थापित झाल्यावर, मग श्वासनियंत्रण शिकून घेण्यासाठी प्राणायामाची आवश्यकता असते. पतंजली मुनींच्या सूत्रांनुसार पूरक, कुंभक आणि रेचक अशा श्वसन अवस्थांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य मिळवणे हा प्राणायामाचा उद्देश असायला हवा. परिसरात सहज सामावून जायचे असेल तर, कुठलेही काम करत असता श्वासोच्छ्वास संथ आणि नियमितपणे होत राहायला हवा. तरच प्रत्याहारास योग्य अशी पोषक अवस्था निर्माण होऊ शकते.

अशी अवस्था निर्माण झाल्यावर, धनुष्यास प्रत्यंचा लावून बाण सोडण्यापूर्वी जसा प्रत्यंचेत धरून तो खेचून घेत असतात, तशी एकतानता आणि अचूक नेम साधण्याची प्रक्रिया, म्हणजेच प्रत्याहार. ह्याचाच व्यावहारिक अर्थ स्वस्थचित्त होणे, दत्तचित्त होणे आणि सावधचित्त होणे असा होतो.

ह्या प्रक्रियेत ज्या विषयावर ध्यान करायचे आहे, त्यावर नेम धरायचा असतो. त्या विषयाची निश्चिती म्हणजेच धारणा होय. प्रत्येक व्यक्तीस स्वतःपुरते कार्यक्षेत्र नक्की झाले म्हणजे त्याची धारणा पक्की झाली असे म्हणता येईल.

धारणा ज्या विषयावर पक्की झालेली असेल त्या विषयावर मग मन एकाग्र करत जाण्याने 'योगः कर्मसु कौशलम्' साध्य होत असते. अशी कौशल्यप्राप्ती हाच योग होय. त्याच विषयाच्या ध्यानात मग जीव गुंतू लागतो. एकाग्रता साधत जाते. व्यक्तीस जेव्हा अशी एकाग्रता साधत असते तेव्हा समाधी लाभते, कैवल्य किंवा मोक्ष प्राप्त झाला असे म्हणता येते. प्रत्येक व्यक्तीस अशा प्रकारे मोक्षप्राप्ती झाली, तर सर्व समाजासच कैवल्यलाभ होऊन समाज स्थिरपद, सुखमय जीवन जगू शकतो. असेच ईप्सित मनाशी धरून अष्टांगयोगाची संहिता सिद्ध झालेली आहे.

निरामय, निरोगी जीवनात अष्टांगयोग कैवल्यप्राप्तीचा मार्ग दाखवतो. मात्र विकारवशात मनुष्याला त्या मार्गावरून चालणे शक्य होत नाही. त्यास पुन्हा आरोग्यप्राप्ती करवून देण्यासाठी आयुर्वेद निर्माण झाला. पतंजली मुनींनी आयुर्वेदाचाही अभ्यास केला होता. मात्र अशा अभ्यासाची उद्दिष्टे राजा रंतिदेवाच्या खालील उक्तीत स्पष्टपणे अभिव्यक्त होतात.

**न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं न पुनर्भवम् ।**
**कामये दुःखतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम्॥**

ह्याचा अर्थ असा आहे की, मला राज्य नको, स्वर्ग नको, पुनर्जन्मही नको; मात्र सर्व दुःखपीडित प्राण्यांची दुःखे लयास जावोत अशीच माझी इच्छा आहे.

अशा प्रकारे कैवल्यप्राप्तीच्या मार्गावरून वाट चालत असता किंवा पुन्हा आरोग्य प्राप्त करत असताही, सदोदित प्राप्त होत राहणाऱ्यास अनुभवाची नोंद आपल्याच भावी काळाकरता, तसेच आपल्या भावी पिढ्यांच्या माहितीकरता लिहून ठेवण्यास आवश्यक असणारे भाषाशास्त्रही पतंजली मुनींच्या अभ्यासाचा विषय होते. पतंजली महामुनी हे मोठे व्याकरणकार, योगदर्शनाचे प्रणेते व आयुर्वेदातल्या चरक परंपरेचे उद्गाते होत. भारतात होऊन गेलेल्या अग्रगण्य विद्वानांत पतंजलींची गणना होते. म्हणूनच त्यांना नमन करताना राजा भर्तृहरीने आपल्या 'वाक्यपदीय' ग्रंथाच्या प्रारंभी पुढील श्लोक लिहिला आहे.

**योगेन चित्तस्य पदेन वाचा मलं शरीरस्यच वैद्यकेन ।**
**योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलीं प्रांजलिरानतोस्मि ॥**

योगाने चित्ताचा, पदाने (व्याकरणाने) वाणीचा व वैद्यकाने शरीराचा मल ज्याने दूर केला, त्या मुनिश्रेष्ठ पतंजलीला मी अंजलिबंध करून नमस्कार करतो. पातंजल योगसूत्रांच्या प्रथम पादातील २४ वे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

**क्लेशकर्मविपाकाशयैः परामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः ।**

योगशास्त्रात; अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हे पाचही क्लेश मानलेले आहेत. ज्यांच्यामुळे व्यक्ती कर्तव्यास तत्पर होत असते. कर्म केले की मग त्याचे फळही मिळत असतेच. चांगले किंवा वाईट. त्यास विपाक म्हणतात. ते फळ मिळेल अशी सूप्त आशाही मनात असतेच. ती आशा म्हणजेच आशय. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हे पाचही क्लेश; त्यांच्या प्रेरणेने करावी लागणारी कर्मे; त्या कर्मांमुळे लाभणारी त्यांची फले आणि त्या फलांच्या दुःख-आनंद पर्यवसानांप्रती मनात असलेली आशा म्हणजेच आशय. ह्या सगळ्यांपासून अलिप्त असलेले पुरुष म्हणजे ईश्वर. ईश्वराच्या ह्या व्याख्येस गृहीत धरूनच, प्रत्येक मनुष्यास ईश्वरत्वाचा अधिकार पोहोचतो. तो ईश्वर होऊ शकत असतो.

प्रत्येकाने ईश्वरच व्हावे. अशा ईश्वराने सर्व प्राणिमात्रांना पसायदान द्यावे. ज्यायोगे सर्व प्राणिमात्र चिरंतन, निरामय, सुखमय जीवन जगू शकतील, अशी प्रार्थना ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या समारोपात लिहून ठेवलेली आहे. इथे हे नमूद केले पाहिजे की, ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे ज्ञानदेवांच्याच परिभाषेत 'भावार्थदीपिका' होय. म्हणून गीतेचा मराठीत केलेला उद्बोध (अनुवाद) म्हणजेच ज्ञानेश्वरी. हे लक्षात घेता, ह्या साऱ्या वाक्-यज्ञाने संतोष पावून प्रत्येक व्यक्तीतील ईश्वराने समाजास काय द्यावे ह्याचे केलेले स्पष्ट विवेचन म्हणजे 'पसायदान.'

अशा रितीने काय साध्य करायचे आहे ह्याबाबत व्यक्ती आणि समष्टी (लोकसमूह) ह्यांच्या कर्तव्यांचे निर्धारण झाले, तरीही त्याची माहिती समस्तांस सतत होत राहणे गरजेचे असते. नाहीतर प्रत्येक व्यक्ती आणि समष्टीही; अपेक्षित, ईप्सित वर्तनाहून निराळे वागत राहतील, आणि चांगले काय ते माहीत असूनही, ते साधण्याची शक्यता शिल्लक राहणार नाही. यासाठी, अशा माहितीचा आणि सतत लाभत राहणाऱ्या नवनव्या अनुभवांमुळे कायमच समृद्ध होत जाणाऱ्या संकल्पनांचा, प्रचार व प्रसार जनमानसात निरंतर करतच राहावा लागतो.

**श्री. नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) -४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

दिशा नियमित वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

शक्यतो स्पर्धा करु नका. करायचीच असल्या स्वतःशी करा.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधन

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रास्ताविक

मी विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' या मासिकात सन २००४/५ पासून भारताच्या संस्कृतीच्या बीज ज्ञानावर सतत लिहीत आलो आहे. बीजज्ञान म्हणजे काय? हा प्रश्न योग्य आहे कारण ज्ञानाची व्याख्या मुख्यतः 'भौतिकवादाच्या' चौकटीत केली जाते व ती स्वाभाविकच आहे, कारण 'भारतीय समाजाच्या जीवनधारणेचा सूर हा आजकाल भौतिक जीवनाला आवश्यक अशाच विषशांशी संलग्न आहे.

## ऐहिक जीवनविषय कोणते?

दरवर्षी इन्कम टॅक्सचे दर व नियम बदलतात, तेव्हा त्या ज्ञानावर जाहीर चर्चा व शिक्षण देणारी व्याख्याने आयोजित केली जातात. नोकरी मिळवण्यासाठी लागणारे शिक्षण साहजिक समाजाच्या ''अजेंडावर'' उच्च पातळीवर ठेवले जाते व आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी प्रवेश परीक्षा व अत्यंत खर्चीक अशा युनिव्हर्सिटी एज्युकेशनमधील जीवघेण्या शर्यतीत जो गोंधळ व सरकारी वा अधिकारी यांचा बेमुर्वत कारभार चालतो त्याचे दर्शन अनेक आठवडे मी टी.व्हीवर पाहत होतो. ह्या व अशा जीवन संघर्षाच्या चढाओढीत समाजाला आपल्या आत्मिक उन्नतीच्या व भारताच्या आत्मिक स्मृतीची जाणीव कशी होणार व त्यासाठी वेळ व उसंत कशी मिळणार नाही का? पण ह्या जीवनसंघर्षाची कारणे शोधल्यास, सामाजिक, राजकीय, आर्थिक रचना व सिस्टिममध्ये, परिवर्तन करणे आवश्यक आहे. हे मान्य करूनही ह्या जीवन धारणेलाबदलण्याची स्वप्ने भारतीय समाज १९४७ पूर्वीपासून बाळगत आला आहे. पण राजकीय सत्ता मात्र ह्या स्वप्नांबद्दल नुसतीच असहिष्णूं नाही तर बेजबाबदार आहे असे दिसते. इतकी वर्षे या ब्रिटिश सत्तेला आपला देश दोषी धरत आला, त्याला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्षे झाली तरी बदल दिसत नाही. मग ही सामाजिक घसरण कशी थांबणार? ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र खात्रीने आपल्या इतिहासात व संस्कृतीत आहे.

## समाजधारणेस आत्मिक बदल हवा आहे.

भारताच्या संस्कृतीमध्ये जे 'सत्य ज्ञान' आहे ते वैश्विक ज्ञान आहे जे 'आत्मज्ञान' आहे जो 'आत्मसंस्कार' आहे व जे जीवनाच्या ध्येयाकडे, ऐहिक जीवनाबद्दल व जन्ममृत्यू ह्या न उकललेल्या प्रश्नांचा अभ्यास आहे किंवा उत्तरसुद्धा आहे, त्याच्या 'सत्य व ऋत' ज्ञानाची स्मृती कशी जागवणारे आहे, त्याचे कोडे पडले आहे 'आजचे नवे नेतृत्व' राजकीय अधिकार मिळवून एक मूलगामी मूलभूत जीवन शाश्वती व 'आत्मिक परिवर्तन' करण्यासाठी सज्ज झाले आहे. अडचणी आहेतच, त्या हिमालयाएवढ्या उंच व अवाढव्य आहेत! नैसर्गिक उत्पात तर एवढे होताहेत की मृत्यूचे थैमान चालू आहे!! हे सर्व अर्थातच काही गूढ संकेत देत आहे!!

## सामाजिक वैचारिक क्रांती

मग हा अधःपात थांबवण्याची जबाबदारी कुणावर पडते? इ.स. २०१४ साली एक राजकीय स्थित्यंतर झाले आहे व भौतिकवादी व स्वार्थी राज्यकर्ते यांना जनतेने लोकशाही पद्धतीने पराभूत केले व भारतीय संस्कृती व अध्यात्मवादी विचारसरणीला मानणारे राज्यकर्ते निवडून दिले. मग आता पुढे काय? मग आजचे नवीन चित्र काय

दाखवीत आहे? लोकसत्तेच्या १५ मे २०१४ च्या अंकात श्री. टेकचंद सोनावणे यांचा लेख आहे. त्याचे शीर्षक आहे, वैचारिकतेची दोन पीठे.

एखादा विचार रुजवण्यासाठी लागणारी सामाजिक अनुकूलता तयार करण्याची जबाबदारी त्या विचारांची मांडणी करणाऱ्यांवर असते. मोदींच्या **(नरेन्द्र मोदी - सध्याचे पंतप्रधान)** वाराणसी आगमनामुळे ही जबाबदारी **बनारस हिंदू विद्यापीठाकडे** आली आहे. 'डावी किंवा उजवी विचारसरणी हवीच' असे मानणाऱ्या दिल्लीच्या **'जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने'** आजवर जे वैचारिक नेतृत्व दिले भारतीय समाजाला, त्याप्रमाणे आता B.H.U. बी.एच.यू.ला (बनारस हिंदू युनिव्हर्सिटी) महत्त्व आल्यास आश्चर्य वाटू नये, असे सांगणारा विशेष वृत्तलेख असा संपादकीय मथळा लाभला'' ते पुढे लिहितात.**''डाव्या विचारसरणीचा झेंडा खांद्यावर घेऊन मिरवणाऱ्या जे एन यू तील राजकीय अभ्यासक, बुद्धिजीवींना समांतर अशा कट्टर उजव्या विचारसणीचे अभ्यासक बनारस हिंदू विद्यापीठात संघटित होत आहेत. भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ही घटना आहे.''. पंडित मदनमोहन मालवीय ह्यांचा आशीर्वाद मिळालेले हे विद्यापीठ राजकीय शास्त्राचे परिवर्तन कदाचित करेल.**




Banaras Hindu University



**Pandit Madan Mohan Malviya**

[Malviya. A prominent lawyer and an Indian independence activist, Malviya considered education as the primary means for achieving a national awakening.]



Around the same time, **Annie Besant** was also trying to expand her Central Hindu School and establish a university. Established in 1898 in the Kamachha area of Varanasi, the vision behind the school was that there should be learning institutions based on Hindu philosophy.[12]



**Swami Dayanand's**

Major Contribution to Society Swami Dayanand founded the Hindu reform organization called Arya Samaj on April 7, 1875 in Mumbai, and also created its 10 principles which are quite distinct from Hinduism, yet based on the Vedas. These principles aimed at advancing the individual and society through physical, spiritual and social betterment of the human race. His aim was not to found a new religion, but to re-establish the teachings of the ancient Vedas. As he said in 'Satyarth Prakash', he wanted true development of humankind by the acceptance

of the Supreme truth and rejection of falsehood by through analytical thinking.




**जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी - न्यू दिल्ली**

[JNU was established in 1969 by an act of parliament.[3] It was named after Jawaharlal Nehru, India's first prime minister and was founded by Indira Gandhi, (Nehru's daughter), and G. Parthsarthi was the first vice-chancellor.

The objective of the founders was to make the university a premier institution of higher learning and to promote research and teaching leading to the increasing engagement of its students and teachers in higher level academic work and national and international policy making.

In 2011-12 the university received over 250 Crores as central subsidy, amounting to over 3,50,000 Rupees per student.]

<u>राजकीय परिवर्तन</u>

पण प्रश्न हा पडतो की हे 'राजकीय परिवर्तन' हे केवळ भौतिकसत्तेचे तोंड, राजसत्तेचे सामर्थ्य व ताकद भारतीय संस्कृतीकडे वळेल. पण ते **भारताचे 'आत्मपरिवर्तन', 'आत्मजागृती' व आत्मज्ञान पुनर्जीवित करण्यात यशस्वी होईल काय? भारताची आत्मजागृती होईल काय?**

**काशी - वाराणशीला ह्या जगाच्या अध्यात्मिक गुरुपदाचे स्थान मिळवून देऊ असे नरेन्द्र मोदी यांनी गंगामातेला साक्ष ठेवून घोषित केले.''**

ही वचनपूर्ती होईल का? मुख्य मुद्दा हा आहे की हे आवश्यक का आहे व हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी काय अडचणी आहेत व काय करावे लागेल!! भारताच्याच नव्हे तर सगळ्या जगाच्या पुढचे चित्र काय आहे.

**Sri. Aurobindo** or ''Adventur of consciousness" **ह्या 'SATPREM' ह्या मूळ फ्रेंच पुस्तकाचा लेखक काय म्हणतो तो पाहू या,** ह्या पुस्तकाचे प्रकाशन प्रथम १९६८ मध्ये झाले व नंतर जवळजवळ ८ (आठ) वर आवृत्त्या झाल्या.

**हा लेखक आपल्या प्रस्तावनेत लिहितो.**

"The age of adventures is over. Even if we go to the seventh galaxi, we shall go there masked and mechanised, and we shall find ourselves once again such as we are :

**"Children in front of death,".................**

Living beings, who do not know very well how they live or why or where they are going. And on Earth, we know quite well that the times of Cortez and [हे दोघे स्पॅनिश नागरिक 'मेक्सिको' अमेरिकाचे colonizationa conversion करणारे एजंट होते इ.स. १४८५]



The same machine locks us in the 6rattrap8 snaps shut...................

We are hence pushed to the wall before the last ground, that remains for us to explore, "the final Adventrue". Ourselves

And the sings abound, they are simple and evident. The most important phenomenon of this decade is not the trip to the moon, but the 'trips' of the drug and the great trans humance of the hippies and the effervescence of the students across the world and where are they to go? There is no longer any space on the swarming beahces (Jmodm included?) no spaces on the crushing roads (दिल्ली?), no space in the growing termites (झुग्गी, धारावी 'स्लमस्) of our cities we must open out clsewhere.

Finally, the value of an experinece is gauged by its power of transforming our life, else we are before a vain dream or a hallucination".)

Now sri. Aunibindo shows us how to make a double discovery of which we are in urgent need, it we want not only to give an outlet to our stiffling chaos, but to tranform our world....

his technique of inner spaces,....
we are led to the greatest discovery at all times to the door of the great secret' which may change the world, namoly,

that "**Consciousness is a power**." But,......"

"Befogged as we are by the "inevitable" scientific condition, wherein we are born, it woulld sean that the only hope man has is in an ever larger proliferation of his machines.

We can do better than our machines and that this enormous mechanism which stifles us can collapse as it was born. and that with all our science we had not ever entered into the "True science of living", or the mastery of the world and ourselves and that before us are opening horisons of perfection and harmons and beauty, beside which our inverntions are like the rough sketches of a novice." (Jan. 1970, Pondicherry)

### १८५७ चा स्वातंत्र्यलढा

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे हे की १८५७ चा लढा राजकीय स्वातंत्र्याची सुरुवात असे मानू, पण ब्रिटिशांचे राज्य भारतावर लादल्यावर एक प्रतिक्रांती झाली. तिचे काही फायदे बाजूला ठेवल्यास लक्षात येईल की भारतीयांची त्यांच्या परंपरेतून वारसाहक्काने हिंदुस्थानाच्या भूभागावर जन्मलेल्या जिवांना किंवा 'जीवात्म्यांना' त्यांच्या वेदिक सत्य व ऋत ज्ञानापासून वंचित व्हावे लागले. त्या ज्ञानाची पृष्ठभागावरची द्वारे जरी हाती लागली तरी त्या ज्ञानाच्या depth knowledge म्हणजेच बीज, मूलज्ञानाला मुकावले लागले. कारण, त्या ज्ञानाची जी Institutional instruments 'साधना यंत्रे' सांभाळणारी आगमशास्त्रे व आध्यात्मिक साधना, ह्या लुप्त झाल्या - त्याचे एक उदाहरण म्हणजे चतुर्वेदी त्रिवेदी, द्विवेदी ब्राह्मणसारखी व आडनावे आज जरी सापडली तरी 'सामवेद' एका महत्त्वाच्या वेदाचे साधकसुद्धा मिळेनासे झाले आहेत!!. आज सामवेदाचा 'संशोधन प्रयत्न' होणे जरूर आहे.

पंडित बाळशास्त्री हरदास म्हणतात त्याप्रमाणे न्यासऋणी व 'समुदायाने', (संचाने) ते पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला त्या दूसऱ्या प्रतीच्या संहितेपासून भारतीय समाजाला वेदांच्या ऋचा पाठ करणे ह्या एका प्राथमिक उद्योगात गुंतून थंड बसावे लागले.

**सायणाचार्य** ह्यांनी वेदज्ञानातील **'Ritualisti'** ज्ञानाचाच फक्त पाठपुरावा केला. त्यामुळे वेदांचा चुकीचा अर्थ लावण्याच्या अज्ञानापासून भारतीय जनतेला वाचवण्यासाठी **"Go back to vales"** म्हणजे वेदज्ञानाकडे स्विरिच्युडाक म्हणजे **आध्यात्मिक ज्ञानाकडे वळा** अशी घोषणा करावी लागली. ह्या धडपडीचे जेवढे कौतुक व्हायला हवे ते अजूनही झाले नाही. केवळ आर्यसमाजाच्या काही विद्वान मंडळींनी हा भार थोड्या प्रमाणात उचलला.






**स्वामी दयानंद सरस्वती**
**आर्य समाजाचे संस्थापक**



**बकीमचंद्र**

श्री. अरविंद यांनी भारतात परतल्यावर ह्या चळवळीच्यावर लक्ष्रा केंद्रित केले. त्याचे पुस्तक **''बकिमचंद्र, स्वामी दयानंद व लोकमान्य टिळक''** हे ह्याच विषयावर लिहीलेले आहे. ह्याचे मुख्य कारण म्हणजे संबंध हिंदुस्थानात (भारतात?) वेदांचे पठण जरी होत होते, तरी **सायणाचार्य किंवा 'चित्रावशास्त्री'** वगैरे काही **विद्वानांखेरीज वेदामधील** आध्यात्मिक **Spirituatl knowledge कडे पूर्णपणे दुर्लक्षच झालेले आहे.** हा एक तुटक प्रयत्न झाला, त्यावर अत्यंत जोमाने व जाणीवपूर्वक व सर्वांगीण असा हल्ला श्री. अरविंद यांनी अनेक पुस्तके लिहून व त्यावर स्वतंत्र भाष्य करून केला. उदाहरणार्थ, **"Sceret in Vedas, Essays on Gita, Hymns to Agni,' upanishads, and more, "Integral Yoga, Synthesis of yoga, The Life Divine"** वगैरे पुस्तके लिहीली, शिवाय पाँडिचरीला एक **Vedic Prototype Village** सुद्धा स्थापन केले. त्यांना **Mary Richard (Mother)** ह्या फ्रेंच स्त्रीचे भरीव सहकार्य मिळाले. पण, त्याचीही दखल राज्यकर्त्यांनी, शिक्षणसंस्थांनी, व Vedic Institutes नी घेतली नाही!!

**ह्या सर्व अर्धवट पुनरुज्जीवनाचा भार कांही विद्वानांनी केलाही, पण ते पूर्णपणे तोकडा व अपुरा आहे. एवढेच नव्हे, तर त्याच्यावरती संशोधन करुन तो भविष्यातील भारतीय समाज व पृथ्वीवरील मानवसमाजाला प्राप्त व्हावा, यासाठी प्रयत्न करावयाला हवेत.** ह्या प्रयत्नांची रुपरेषा मी **'दिशा' ह्या मासिकाच्या जानेवारी २०१४ च्या अंकात मांडली होती.** त्या मूळ इंग्रजी निवेदनाचे मराठी भाषांतर इथे लिहून माझा लेख संपवतो.

**श्री. अरविंद स्वतः ह्या वेदीक आध्यात्मिक पुनस्मृती व पुनरुज्जीवनाचे, भारतीय वेदिका सिरिच्युअल आत्मजागृतीचे तीन भागांतील प्रयत्नांचे वर्णन करतात ते असे.**

''आपल्या पूर्वकालीन सत्य श्रुती ज्ञानात्मक **सिरिच्युअल** ज्ञानांची (आध्यात्मिक ज्ञानाची) पुनस्मृती जागी करणे तीही त्या ज्ञानाच्या भव्यतेसहित सखोल, अर्थासहित आणि पूर्णत्वाने करणे, हे **प्रथम कर्तव्य होय**. या स्पिरिच्युॲलिटीची स्थापना व जाण नवीन तत्त्वज्ञानात, साहित्यात, कला विज्ञानात आणि चिकित्सक ज्ञानात करणे हे **दुसरे कर्तव्य होय**. त्यानंतरही भारतीय आत्मतत्त्वाच्या प्रकाशात सध्याचे प्रचलित नवीन प्रश्नांबाबत स्वतंत्रपणे व मूलभूत विचार मांडणे आणि त्यावर आधारून जास्त समन्वयी, जास्त सत्यमयी अशा स्पिरिच्युअल किंवा खऱ्या अध्यामिक धारणा असणाऱ्या समाजाची पुनः उभारणी करणे हे सर्वांत महत्त्वाचे **तिसरे कर्तव्य ठरेल. ह्या तिन्ही** दिशातील प्रयत्नांच्या यशावर भविष्यातील मानवजातीची व त्या मदतीच्या 'मात्रेवर' या कार्याची मोजमापणी होऊ शकेल!!''

**श्री. अरविंद घोष**
**नवीन सुरवात**

ह्या अजेंडावर २०१४ सालापासून सुरुवात होईल अशी आशा करूया तरच व मगच केवळ राजकीय सत्तेतील नवीन बदलाचे सार्थक झाले असे म्हणता येईल, नाही का?

**यशवंत साने**
सानेवा अपार्टमेंट, सारस्वत बँकशेजारी,
अग्यारीलेन, ठाणे ह्न ४०० ६०१.
दुरध्वनी : २५३६ ८४५०
भ्रमणध्वनी : ९००४०५१८४७
E-mail : saneyr1@gmail.com

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

**सन २०१३ - १४ वार्षिक निकाल :**

सन २०१३ - १४ या शैक्षणिक वर्षात ८८४ विद्यार्थी शिकत होते. वार्षिक परिक्षेचा निकाल १००% लागला असून विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे श्रेणी प्राप्त केल्या आहेत.

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | ''अ'' श्रेणी प्राप्त विद्यार्थी | ''ब'' श्रेणी | ''क'' श्रेणी | ''ड'' श्रेणी प्राप्त |
|---|---|---|---|---|---|
| इ. १ ली | १६५ | १४४ | १४ | ०६ | १ |
| इ. २ री | २३८ | १६३ | ५१ | २१ | ३ |
| इ. ३ री | २०८ | १३८ | ५७ | १३ | - |
| इ. ४ थी | २७५ | १९६ | ७१ | ०८ | - |

**नवागतांचे स्वागत**

१६ जून २०१४ रोजी इयत्ता १ लीतील नवोदित विद्यार्थ्यांचे गोळ्या वाटून स्वागत करण्यात आले तसेच सर्वशिक्षण अभियान अंतर्गत शासनाकडून आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा. श्री. बसवराज बन्ने व शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते इ. १ ली ते ४ थी विद्यार्थ्यांना करण्यांत आले.

**पालक सभा**

२८ जून २०१४ रोजी पालक-शिक्षक संघाची स्थापना पालकबसभेत करण्यात आली. तसेच याच सभेत माता पालक संघाची स्थापना करण्यात आली.

**इ. ३ री ची एम. डी. एस. परीक्षा**

३० जानेवारी २०१४ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेस ४८ विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा निकाल ८८% लागला अूसन साक्षी राजेंद्र फुटक हिचा केंद्रात २ रा क्रमांक व हर्षल संजय भुरे हिचा ३ रा क्रमांक आला असून त्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. यांना इ. ३ री च्या सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

**इ. ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा**

मार्च २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस इ. ४ थीचे विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा निकाल १००% लागला असून यांना इ. ४ थी च्या सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

**दिंडी**

१० जुलै २०१४ रोजी १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची ''आषाढी एकादशी'' निमित्त दिंडी काढण्यात आली. दिंडीत विद्यार्थ्यांनी संतांचे - वारकऱ्यांचे व विठ्ठलाला रखुमाईंचे वेष परिधान केले होते. त्यामुळे सर्व प्रांगणाला वेगळेच रूप आले होते.

**गुरुपौर्णिमा**

शनिवार दि. १२ जुलै २०१४ ला शाळेत इ. १ ली ते ४ थी चा गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा करण्यात

आला. यात निवडक विद्यार्थ्यांनी गुरुशिष्यांच्या गोष्टी सांगितल्या मुख्याध्यापकांनी या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

**व्यवस्थापन समिती व पालक सभा**

१९/७/१४ ला व्यवस्थापन समितीची पुनर्बांधणी करून नवीन सदस्यांची निवड करण्यात आली. समितीचे कार्य - महत्त्व सौ. भंडारे यांनी सभेच्या सचिव व मुख्याध्यापक या नात्याने सर्व पालकांना समाजवाले. तसेच पालक-शिक्षक संघाचे महत्त्व कार्य सौ. कांचन मोहिते यांनी सांगितले. सौ. धर्माधिकारी यांनी माता पालक संघाला मुलींच्या शिक्षणाविषयी - रक्षणाविषयी व संघाच्या कार्याविषयी माहिती दिली.

**दीपपूजन**

जसे गुरुपौर्णिमेला गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरु पौर्णिमा साजरा करतात, त्याचप्रमाणे आपल्या प्रकाशाने सर्वांचे जीवन उजळून टाकणाऱ्या सूर्याचे प्रतीक असणाऱ्या, आपल्याला सतत प्रकाश देणाऱ्या - प्रेरणा देणाऱ्या दिव्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २६ जुलै रोजी ‘‘दीप पूजनाचा’’ कार्यक्रम घेण्यात आल्या. वेगवेगळ्या आकाराच्या पुरातन नवीन दिव्यांची पूजा करून त्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व समजावून सांगितले.

**मनःशक्ती शिबिर**

शनिवार दिनांक २/८/२०१४ ला मनःशक्ती केंद्रातर्फे इ. ३ री च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. त्यात त्यांनी शिक्षक - पालक व समाज याविषयी आदरभाव कसा ठेवावा तसेच अभ्यासासाठी एकाग्रता स्थिरता कशी आवश्यक आहे. ह्याची मेंदूक्राती - या विषयाद्वारे उत्तम व सोप्या पद्धतीने मुलांना समजावले.

तसेच इयत्ता १ ली पालकांशीही संवाद साधून आपण आपल्या पाल्यांसमोर पाल्यांशी कसे वर्तन ठेवावे याचेही मार्गदर्शन पालकांना श्री. बापर्डे - श्री. पराडकर यांनी केले. या शिबिराचा इ. १ लीच्या १२५ पालकांनी लाभ घेतला.

**रक्षाबंधन व श्रावणी शुक्रवार**

श्रावण महिना म्हणजे सर्वत्र आनंद महिना घेऊन येणारा व सणांची रेलचेल असणारा महिना त्याचे त्याचे वैज्ञानिक-धार्मिक महत्त्व समजावले. नाती जपणे किती महत्वाचे असते याची माहिती श्रावणी शुक्रवार या उपक्रमाद्वारे समजावली. रक्षाबंधनाचा उपक्रम राबवून बंधु- भगिनीच्या नात्यांचे कर्तव्य सांगितले. इ. ३ री च्या सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर राख्या तयार केल्या. इ. १ ली ते ४ थी सर्व मुलांना परस्पर राख्या बांधण्याचा कार्यक्रम साजरा करून परस्परांचे रक्षण करण्याची भावना जागृत करण्यात आली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

दि. १३/०७/२०१४ रोजी

- डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा. वि.) तील ज्येष्ठ शिक्षक श्री. भानुदास वसंत गावित यांचे राहत्या घरी शहापूर येथे वयाच्या ४८ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

  दि. १२ जुलै रोजी गुरुपौर्णिमा प्रत्येक वर्गात साजरी करण्यात आली.

- P & G यांच्या तर्फे इ. ६ वी व ७ वी च्या मुलींसाठी वयात येताना आरोग्यविषयक जागृतीचा कार्यक्रम सादर करण्यात आला.


- दि. २४ व २५ जुलै रोजी अनुक्रमे भूतांची शाळा व Monkey the great हे दोन बालचित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

- ब्राह्मण सभा, ठाणे तर्फे आयोजित संस्कृत सुभाषित पाठांतर स्पर्धेत ५ वी ते ७ वी च्या लहान गटात ऋचा जोशी ६ वी अ हिला प्रथम क्रमांकाचे व हित्रिका पाटील ७ ब हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.
- प्रारंभ कला ॲकॅडमी, ठाणे पुरस्कृत कै. कमल भालराव स्मृती नाटयछटा स्पर्धेत इ. ६ वी ते १० वी च्या मोठया गटात कु. ऋचा जोशी हिला तृतीय ह्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- दि. ६ ऑगस्ट रोजी हस्तकला विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांचे प्रदर्शन व विक्री या कार्यक्रमाचे उद्घाटन सन्माननीय सौ. सुमेधा वि. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. हस्तकला विभागाच्या सौ. बोरवणकर यांनी हे प्रदर्यान हस्तकला कक्षेत भरविले होते. रक्षाबंधनानिमित्त स्काउटगाईड विभागातर्फे गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली १० गाईडसूनी जिद्द विशष शाळेत तेथील विशेष विद्यार्थ्यांसोबत हा सण साजरा केला. याप्रसंगी त्यांना खाऊ व डबे वाटण्यात आले.
- शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी स्काउटगाईड विभागातर्फे गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
- १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त शाळेत कार्यक्रम सादर करण्यात आला. त्याप्रसंगी श्रीमती आशा जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्या वेळी मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांची भाषण झाली. कार्यक्रमाचे आयोजन सौ. धोत्रे व श्री. दिघे यांनी केले.

**मार्च २०१४ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | १८२ |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | - | १८२ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - | १८२ |
| टक्केवारी | - | १०० % |

| | | |
|---|---|---|
| विशेष प्राविण्य | - | १३९ |
| प्रथम श्रेण | - | ३१ |
| द्वितीय श्रेणी | - | १२ |
| तृतीय श्रेणी | - | ०० |




| टक्के | सर्वोत्तम पाच विषयंतील विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | ६० | ३३ |
| ८० - ८९ | ६१ | ३४ |
| ७० - ७९ | ३० | १६ |
| ६० - ६९ | १९ | १० |
| ५० - ५९ | ९ | ५ |
| ४९ च्या खाली | ३ | २ |

## पहिले दहा क्रमांक :

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| १ | दफ्तदार ऋत्विज | ९६.८० |
| २ | घाग रितिका | ९६.६० |
| २ | जोशी प्रणिल | ९६.६० |
| ३ | बर्वे अनिकेत | ९६.४० |
| ४ | केळकर नेहा | ९६.२० |
| ५ | भट अद्वैत | ९६.०० |
| ६ | गोखले अमोघ | ९५.८० |
| ६ | सरोदे मितेश | ९५.८० |
| ६ | शेटे सानिका | ९५.८० |
| ६ | कुलकर्णी सौरभ | ९५.८० |
| ७ | सांगलीकर सिद्धी | ९५.४० |

| क्र. | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| ८ | बायकेरीकर गणेशराज | ९५.२० |
| ८ | नवरे मयुरेश | ९५.२० |
| ८ | आगाशे साकेत | ९५.२० |
| ८ | जोशी राज | ९५.२० |
| ८ | नर्नावर अनुज | ९५.२० |
| ८ | पाटील समृद्धी | ९५.२० |
| ८ | मालुसरे प्रियंका | ९५.२० |
| ९ | अभ्यंकर अद्वैत | ९५.०० |
| ९ | मराठे निनाद | ९५.०० |
| १० | गजमल सोनाली | ९४.८० |
| १० | प्रधान अथर्व | ९४.८० |
| १० | नातू अद्वैत | ९४.८० |

## विषयातील सर्वप्रथम क्रमांक :

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | जोशी प्रणिल | ९० |
| मराठी | आगाशे साकेत | ९२ |
| **संस्कृत** | **बर्वे अनिकेत** | **१००** |
| हिंदी | पाटणकर सुयश | ८८ |
| गणित | भट अद्वैत | ९९ |
| | बर्वे अनिकेत | |
| | मलिये अमित | |
| | दफ्तरदार ऋत्विज | |
| विज्ञान | दफ्तरदार ऋत्विज | ९९ |
| | बर्वे अनिकेत | |
| | घाग रितिका | |
| | केळकर नेहा | |
| | सरोदे मितेश | |
| | जोशी प्रणिल | |

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| समाज | दफ्तरदार ऋत्विज | ९८ |
| शास्त्र | बर्वे अनिकेत | |
| | घाग रितिका | |
| | केळकर नेहा | |
| | सरोदे मितेश | |
| | जोशी प्रणिल | |
| | आगाशे साकेत | |
| | जोशी राज | |
| | नार्नावर अनुज | |
| | मालुसरे प्रियंका | |
| | अभ्यंकर अद्वैत | |
| | सत्रा तक्ष | |
| | कुलकर्णी सौरभ | |
| | शेटे सानिका | |
| | ढाप्रे मृण्मयी | |
| | जोशी नितीश | |

बागेत अनेक फुले असतात पण ती सारीच काही सुगंध देत नाहीत.

## फेब्रु. २०१४ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : १००%

| इ. | परीक्षेला बसलेल्या विद्यार्थी | प्रावीण्यासह उत्तीर्ण | प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण | तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | ७ | २ | ३ | - | २ |
| ६वी | ७ | १ | ५ | १ | - |
| ७वी | १९ | - | १२ | ६ | १ |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे**

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | ईशान मलिये | ९५ |
| ६वी | निशिता फडके | ८६ |
| ७ वी | सुचित गुप्ते | ८६ |

**वाडिया कॉलेज पुणे आयोजित एप्रिल २०१४ महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षीसे पटकावली.**

**इ. ८ वी -**

१) शांभवी जोशी - राज्यस्तरीय १८ वा क्रमांक व जिल्हास्तरीय १ ला क्रमांक

२) ओंकार वरुडकर - विशेष पुरस्कार

३) मिहिर देसाई - प्रमाणपत्र

**इ. ९ वी**

१) गायत्री पाटील - विशेष पुरस्कार

२) शुभम पट्टेकर - विशेष पुरस्कार

**MKCL** आयोजित **Maharashtra Olympiad Movement** चा निकाल :

इ. ६ वी तील यश कोकाणेने जिल्ह्यात २ रा व राज्यात १२ वा क्रमांक पटकावला. तसेच इ. ८ वी तील शांभवी जोशीने जिल्ह्यात ४ था व राज्यात ४४ वा क्रमांक पटकावला. निकाल खालीलप्रमाणे -

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | जिल्हा स्तरीय क्रमांक | राज्य स्तरीय क्रमांक |
|---|---|---|---|
| ५ वी | वेदांती हिंदुराव | १३० | २७९ |
| ६ वी | यश कोकाणे | २ | १२ |
| | विश्वराज बोरकर | ४ | ३७ |
| | तेजस भाटे | ७ | ९३ |
| | शमिका रेडकर | ५७ | ३१५ |
| ८ वी | शांभवी जोशी | ४ | ४४ |
| | तन्मय गिरी | १८ | १८७ |
| | सागर रेळेगांवकर | ५७ | ४६४ |

असामान्य बुद्धीपेक्षा तिचा असामान्य उपयोग श्रेष्ठ असतो.

**२०१३ - २०१४ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

**राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे**

**बालवीर**

१) कु. सागर राळेगणकर
२) कु. जिनय गडा
३) कु. गौरांग मोरे
४) कु. स्मित देशमुख
५) कु. उत्कर्ष गोइल
६) कु. चिराग सुकरे

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१३-१४ चा निकाल १००% निकाल : परीक्षेला बसलेले विद्यार्थी-३५**

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ति धारक विद्यार्थी :

१) प्रज्ञा घारपुरे - २ रा क्रमांक
२) अथर्व जोशी - २ रा क्रमांक
३) वरदा अवचट - ६ वा क्रमांक
४) अवनी इमानदार - ६ वा क्रमांक
५) यशदा जोशी - ७ वा क्रमांक
६) रचना बराडिया - ८ वा क्रमांक
७) सानिका गोरे - ८ वा क्रमांक
८) क्रित्वी व्यवहारकर - ८ वा क्रमांक
९) आदित्य दातार - ९ वा क्रमांक
१०) तानिशा महाजन - १० वा क्रमांक

## विद्या प्रसारक मंडळाचे - जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय वृत्तान्त

महाविद्यालयाच्या विनाअनुदानित बी.एम.एम. विभागातर्फे अभ्यासक्रम बदलावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. बी.एम.एम. (Sem I) आणि (Sem V) च्या परीवर्तित अभ्यासक्रमावर उद्‌घाटन बोर्ड ऑफ स्टडीजचे अध्यक्ष अध्यक्ष डॉ. ॲन्सी जोस, सदस्य डॉ. शिखा दत्त, डॉ. कमला राजीव आणि प्राध्यापिका वृंदा देव मोघे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी यात सहभाग घेतला होता. कार्यशाळेत मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थांना लाभले. कार्यशाळा यशस्वी होण्यात विनाअनुदानित सर्व प्राध्यापकांनी भरपूर प्रयत्न केले.

**वाणिज्य विभाग**

महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम "Investor Awareness Programme" आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम Institute of Company Secretearijs of India (ICSI) and Ministry of corporak Affairs यांच्या विद्यमाने प्रथम व द्वितीय वर्षीय वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम यशस्वी होण्यास डॉ. शकुन्तला ए. सिंह यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच वाणिज्य विभागाच्या सर्व प्राध्यापकांनी त्यासाठी अथक परिश्रम घेतले.

**इंग्रजी विभाग**

इंग्रजी विभागातर्फे 'Indian English Literature and Indian Writing in Translation' या विषयांवर आंतरमहाविद्यालयीन शोध पत्रिका सादर करण्याची स्पर्धा आयोजित केली होती. मुंबईतील एकुन १४ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा यात सहभाग होता. उत्तम शोधनिबंधांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाला बक्षीस देण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्मिता भिडे व प्रा. मनोज पाथरकर यांच्या हस्ते पारितोषिकवितरण करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शंकुतला ए. सिंह यांच्या मार्गदर्शनाने स्पर्धा यशस्वीपणे पार पडली.

**स्टाफ ॲकॅडमी**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या स्टाफ ॲकॅडमीतर्फे ३० जुलै २०१४ रोजी दैनिक लोकसत्ताचे संपादक व प्रसिद्ध लेखक श्री. गिरीश कुबेर यांचे प्राध्यपकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी 'तेलाचे राजकरण, त्यामुळे झालेला विकास, आतंकवाद आणि युद्ध' यांचे विषय अतिशय उत्कृष्ट, अभ्यासपूर्ण संशोधन प्राध्यापकांसमोर मांडले.

**स्कॉलर ॲकॅडमी**

महाविद्यालयाच्या स्कॉलर ॲकॅडमीतर्फे Environmental Systanability and our Responsibitity. या विषयावर डॉ. श्रद्धा काले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**स्टुडण्टस् फोरम**

महाविद्यालयाच्या स्टुडण्टस् फोरमतर्फे विद्यार्थ्यांमध्ये नेहमीच नवनवीन विषयांवर चर्चा घडविली जाते. विद्यार्थी आपले विचार या मंचावर व्यक्त करीत असतात. मोदी सरकारचे आवाहन आणि अपेक्षा या विषयावर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट साधकबाधक चर्चा केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता डॉ. शकुन्तला सिंह यांचा नेहमीच पाठिंबा असतो, तसेच स्टुडण्टस् फोरमचे सर्व कार्यकारी मंडळ नेहमीच परिश्रम घेत असतात.

**काउन्सिलिंग सेल**

महाविद्यालयाच्या काउन्सिलिंग सेलतर्फे Poster Making Competiton चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी यात उत्कृष्ट उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. स्पर्धेचे शीर्षक होते Role of Social Networking in our life.

**W.D.C.(महिला विकास कक्ष)**

या वर्षातील राष्ट्रीय पातळीवरील परीषद महिला विकास कक्ष करणार आहे. भारतीय महिलांची समानतेची आस - वचने समस्या व भवितष्य असा विषय आहे. या परिषदेची आमंत्रणे सर्व महाविद्यालयांना जून-जुलै महिन्यात पाठविण्यात आली.

विद्यार्थिनींची सुरक्षा हा आजच्या काळातील कळीचा मुद्दा आहे, हे लक्षात घेऊन महिला विकास व रिस्क प्रो यांनी एकत्रितपणे विद्यार्थिनीसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली. ही कार्यशाळा २३ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थिनींचा उत्कृष्ट सहभाग कार्यशाळेत होता. रिस्क प्रोचे उपाध्यक्ष मंगेश सावंत यांचे मार्गदर्शन लाभले.

**संस्कृत विभाग**

संस्कृत विभागातर्फे गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. श्रीव्यासपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व सांगितले. श्रीव्यासांच्या जीवनातील कथा यावेळी सांगितल्या. प्रथम - द्वितीय - तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

**व्यास सभा**

महाविद्यालयातील प्राध्यापांकासाठी दर शुक्रवारी व्यास सभेचे आयोजन करण्यात येते. या अंतर्गत प्राध्यापकांमध्ये विविध विषयांवर साधकबाधक चर्चा करण्यात येते. व्यास सभेत चर्चा झालेले विषय होते

- Article - 370
- मोदी सरकार : अपेक्षा आणि आव्हाने
- The Union Budget - 2014 - 15
- काव्यवाचन
- Draught in Maharashtra

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

१) वि.प्र.मं.च्या टि.एम.सी. विधी महाविद्यालयाने नवीन १० संगणक विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी व अभ्यासासाठी Server room मध्ये बसविले.

२) India Bulls Foundation ने महाविद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ केली आहे. यासाठी त्यांनी आर्थिक आधारावर ही शिष्यवृत्ती देण्याचे ठरवले आहे.

३) द्वितीय व तृतीय विधी वर्ग दिनांक १७ जुलैपासून सुरू करण्यात आले. सदर वर्ग परीक्षेच्या निकालापूर्वी सुरू करण्याचे कारण नियमाप्रमाणे प्रत्येक सत्रामध्ये शिकवणीचे दिवस कमीत कमी ९० तरी व्हावेत व एकूण अभ्यासक्रम पुर्ण व्हावा हे होते.

४) महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या ६ विद्यार्थ्यांनी "Summer Intershio" कार्यक्रम महारष्ट्र मानवी हक्क आयोग यांच्याकडे यशस्वी रीत्या पुर्ण केला.

५) मुंबई विद्यापीठाने नुकताच विधी शाखेचा निकाल जाहीर केला. महाविद्यालयाचा निकाल खालीलप्रमाणे
प्रथम विधी ३५.३४%
द्वितीय विधी ६२.५३%
तृतीय विधी ५०.००%

६) महाविद्यालयामध्ये प्रथम विधीसाठी अर्ज करण्याची व अर्ज स्वीकृतीची शेवटची तारीख ३१ जुलै २०१४ होती.

७) महाविद्यालयाच्या "Moot Court Hall" मध्ये न्यायालयामध्ये वातावरण व चित्र निर्माण होण्यासाठी लाकडी खुर्च्या व इतर साहित्य बसविण्यात आले.

## तंत्रनिकेतन वार्ता

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) उन्हाळी सन २०१३-१४ परीक्षेचे निकाल जाहीर**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी सन २०१३ - १४ या वर्षीच्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले घवघवीत यश संपादन केले आहे. तंत्रनिकेतनमध्ये अव्वल मार्कांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कोर्सनुसार नावे व गुण खालीलप्रमाणे आहेत.

**प्रथमवर्ष (SEM I + SEM II)**

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | सागरे निलेश बसावराज | CH | १२२७/१५०० | ८१.८० |
| २ | जंगम चिन्मय समीर | CH | १२१४/१५०० | ८०.९३ |
| १ | यादव रिचा रामानरेश | CO | १२६९/१४५० | ८७.५२ |
| २ | चोगले इम्रिसाम इक्बालहुसेन | CO | १२५२/१४५० | ८६.३४ |
| १ | पडवळ व्टिंकल प्रीतम | EPS | ११४३/१४०० | ८१.६४ |
| २ | रांजणे स्वप्निल बळवंत | EPS | १११३/१४०० | ७९.५० |
| २ | पाटील दक्षता दिनकर | EPS | १११३/१४०० | ७९.५० |
| १ | कदम गौरव | IE | १११९/१३५० | ८२.८९ |
| २ | प्रीतम माळी | IE | १११६/१३५० | ८२.६७ |

## प्रथमवर्ष (SEM I + SEM II)

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | सोनार तेजल सुरेश | IF | १३००/१४५० | ८९.६६ |
| २ | यादव वर्षा लक्ष्मण | IF | १२२१/१४५० | ८४.२० |
| १ | कोनार मढवी | IS | ११५१/१३५० | ८५.२६ |
| २ | बिरवडकर नतलीई | IS | १११३/१३५० | ८२.४४ |
| १ | निबरे नेहा संजीव | MU | १११८/१३५० | ८२.८१ |
| २ | सुतार अंकिता सूर्यकांत | MU | १०८४/१३५० | ८०.३० |

## द्वितीयवर्ष (SEM III + SEM IV)

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | जयस्वाल मयांक सूर्यप्रकाश | CH | १२२२/१६५० | ७४.०६ |
| २ | म्हाबदी प्रतीक्षा अरविंद | CH | ११९१/१६५० | ७२.१८ |
| १ | कवीश्वर रोशनी एस. | CO | १५२६/१७५० | ८७.२० |
| २ | मोरे पूजा दीपक | CO | १५०४/१७५० | ८५.९४ |
| १ | खारोटे विशाल मिलिंद | EP | १३७०/१७०० | ८०.५९ |
| २ | भट ओमकार रत्नाकर | EP | १३६८/१७०० | ८०.४७ |
| १ | नीता चौधरी | IE | १३५२/१६०० | ८४.५० |
| २ | प्रतीक वाघ | IE | १३४८/१६०० | ८४.२५ |
| १ | आगरकर प्रियंका गुलाब | IF | १५४६/१७५० | ८८.३४ |
| २ | चव्हाण शुभांगी नामदेव | IF | १५२९/१७५० | ८७.३७ |
| १ | गोल्ये मेधा नंदकिशोर | IS | १३६२/१६०० | ८५.१३ |
| २ | राऊत विशाल विद्याधर | IS | १२६६/१६०० | ७९.१३ |
| १ | दक्षिणदास तृप्ती राजेंद्र | MU | १३५६/१६०० | ८४.७५ |
| २ | गुप्ता प्रतीक्षा राजेश | MU | १०७४/१६०० | ६७.१३ |

## तृतीयवर्ष (SEM III + SEM IV)

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | जाधव प्रेम प्रमोद | CH | १४४९/१७०० | ८५.२४ |
| २ | महाडिक प्रथमेश बलिराम | CH | १४२८/१७०० | ८४.०० |
| १ | बागले अक्षता संतोष | CO | १३५६/१५५० | ८७.४८ |
| २ | पंडित वरद प्रकाश | CO | १३१७/१५५० | ८८.३० |

### तृतीयवर्ष (SEM III + SEM IV)

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पटवर्धन सलील सतीश | EP | १४५७/१६५० | ८८.१४ |
| २ | परब तेजस विनायक | EP | १४३८/१६५० | ८७.१५ |
| १ | अश्विनी शेडगे | IE | १५६०/१७५० | ८९.१४ |
| २ | निखिल चव्हाण | IE | १५३३/१७५० | ८७.६० |
| १ | वैती प्रिया जितेंद्र | IF | १४६५/१६०० | ९१.५६ |
| २ | पाटील समीक्षा महेश | IF | १४१५/१६०० | ८८.४३ |
| १ | शेट्टीगर सोनिया रवी | IS | १४६६/१७०० | ८६.२४ |
| २ | मोहिते सिद्धेश गोविंद | IS | १४३१/१७०० | ८४.१८ |
| १ | शर्मा त्रिप्ती अनुपकुमार | MU | १६१०/१८०० | ८९.४४ |
| २ | घरत निकिता संतोष | MU | १५९०/१८०० | ८८.३३ |

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग इत्यादी स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणेमधील MSBTE उन्हाळी परीक्षा - २०१४ च्या नियमित बसलेल्या विद्यार्थ्यांच्या निकालाचे विश्लेषण....**

उन्हाळी परीक्षा सन ह्व २०१४ चे निकाल MSBTE (महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) ने जाहीर केले. त्या परीक्षेत वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनमधील नियमित बसलेल्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे विश्लेषण खालीलप्रमाणे

**तक्ता - १**

| सत्र | एकूण परीक्षेला बसलेले विद्याथी | डिस्टिंकशन | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | उत्तीर्ण श्रेणी | ATKT WFLS/ LSP | नापस | एकण ATKT सह उत्तीर्ण | एकूण सह उत्तीण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| II | 352 | 37 | 87 | 27 | 0 | 98 0 | 103 | 249 | 70.74% |
| IV | 419 | 71 | 147 | 40 | 0 | 85 0 | 76 | 343 | 81.86% |
| VI | 439 | 154 | 181 | 13 | 0 | 0 28 | 63 | 376 | 85.65% |

वृत्तसंकलन - **श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.

**संपादकीय** (कव्हर २ वरून)...

संस्था स्थापन झाली. युनेस्को आणि ही संस्था मिळून जगातील सर्व सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्याचो प्रयत्न करतात. त्यांच्या या प्रयत्नामुळे भारतही काही चोरल्या गेलेल्या मूर्ती परत मिळवू शकला, परंतु ती संख्या फारच नगण्य आहे. २००२ ते २०११ या कालावधीत इजिप्तने मात्र ५००० पेक्षा जास्त अशा चोरल्या गेलेल्या मूर्ती आणि वस्तू परत मिळविल्या.

भारताचा दुसरा शेजारी देश म्हणजे नेपाळ. तेथेही काही लाखोंनी संस्कृत हस्तलिखिते उपलब्ध आहेत. दुर्दैवाने भारताला मात्र त्या सांस्कृतिक संचिताचा उद्धार करावा असे फारसे वाटले नाही. अनेक व्याकरण, काव्य, गणित, ज्योतिष, तंत्रविद्या, स्थापत्य यांची संस्कृत हस्तलिखिते नेपाळमध्ये उपलब्ध आहेत. संस्कृतच्या जर्मन अभ्यासकांना मात्र त्याचे महत्त्व लक्षात आले आणि १९७० साली नेपाळ-जर्मनी हस्तलिखितांच्या जतनाचा कार्यक्रम अस्तित्वात आला. या सर्व हस्तलिखितांच्या लाखो पानांची छायाचित्रे लाखो डॉलर्स खर्च करुन काढण्यात आली. २००२ साली याचा पुढचा टप्पा म्हणून या सर्व हस्तलिखितांची विषयवार सूची करण्याचे काम चालू झाले आणि आजही ते चालू आहे. जर्मनीच्या सांस्कृतिक सजगतेचेच हे उदाहरण आहे.

सिल्करोड (Silk Road) हा चीन आणि मध्य आशियामधील संस्कृतींचा व्यापाराचा मार्ग. या दळणवळणाच्या मार्गातूनच चिनी संस्कृती आणि हस्तकला युरोपमध्ये पोहोचली. या व्यापारी मार्गावरच डुनहॉंग (Dunhaung) येथील स्तूप आणि गुहांमध्ये हजारोंनी चिनी, खरोष्ठी, ब्राम्ही लिपीतील बुद्ध संस्कृतीवरील हस्तलिखिते १९०० साली काही अभ्यासकांच्या निदर्शनास आली. दुर्दैवाने हा संग्रह बीजिंग, लंडन, पॅरिस, बर्लिन येथील संग्रहालयांमधून विखुरला गेला. गेली काही वर्षे या संग्रहाला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रयत्नाला यश येऊन संस्कृतमधील काही वैद्यक आणि बौद्ध संस्कृतीच्या साहित्यावरील हस्तलिखितांची सूची आता प्रकाशित झालीा आहे. हा सर्व संग्रह सुमारे १५०० ते २००० वर्षांपूर्वीचा असल्याने भारताच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विकासाच्या अभ्यासाचे ते एक मोठे साधन आहे.

वर उल्लेख केलेल्या सर्वच प्रकल्पांची संकेतस्थळे आज उपलब्ध आहेत. प्रगत देशांच्या सांस्कृतिक सजगतेचाच हा एक उत्कृष्ट नमुना आहे. ऑक्सफर्ड, केंब्रिज, बीजिंग, वॉशिंग्टन येथे उपलब्ध असलेल्या संस्कृत आणि तिबेटियन हस्तलिखितांचा संग्रहही आता उपलब्ध होत आहे तो त्या त्या राष्ट्रांच्या सांस्कृतिक सजगतेमुळेच.

संस्कृतप्रमाणेच मराठीचीही हजारोंनी हस्तलिखिते आज सांस्कृतिक अनास्थेमुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. मराठी भाषा आणि संस्कृतीचे एरवी भोकाड पसरून भांडवल करणाऱ्या राजकीय पक्षांना याचे काहीच सोयरसुतक नाही. एका अमेरिकन विद्यापीठाच्या आर्थिक मदतीतून पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संस्थेचे निवृत्त ग्रंथपाल श्री. मंजूळ यांच्या प्रयत्नांनी पुण्याला या हस्तलिखितांच्या संवर्धनाचे काम चालू झाले आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पुण्याच्याच डेक्कन कॉलेज, आनंदाश्रम आणि वाईची प्राज्ञ पाठशाळा यांच्या सुमारे ९०० मराठी हस्तलिखितांचे छायाचित्रीकरण पुरे झाले आहे. मराठीच्या अमेरिकेतील प्रसिद्ध अभ्यासक श्रीमती ॲना फेल्डहाउस (Anne Feldhaus) यांच्या मदतीने प्रसिद्ध ब्रिटिश लायब्ररीच्या संकेतस्थळावर ही सर्व हस्तलिखिते वाचकांना आता निःशुल्क उपलब्ध झाली आहेत. वैदिक संहितांचे पठण हे अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने करावे लागते. वेदांच्या अनेक शाखाही आज लुप्त झाल्या

स्नेहाला जी किंमत असते ती इतर कशालाही नसते.

आहेत; तरीही भारतामध्ये काही ठिकाणी अशा वैदिक शाखांचे पठण परंपरेने चालू आहे. यापुढील पिढ्यांमध्ये ते संक्रमित होणे फार कठीण आहे. या वारशाचे सांस्कृतिक महत्त्व ओळखून डेन्मार्कमधील एका संस्कृतच्या अभ्यासक विदुषींनी त्यांचे संपूर्ण ध्वनिमुद्रण जतन करून ठेवले आहे. पाश्चात्त्य अभ्यासकांना असलेल्या सांस्कृतिक सजगतेमुळेच या गोष्टी आज शक्य आहेत.

सोमवार, दिनांक ११ ऑगस्टच्या मुंबई उच्च न्यायालयाने दहिहंडीबद्दल दिलेल्या निर्णयामुळे, आपल्या सणांना आलेले सवंग आणि बाजारी स्वरूप काही प्रमाणात तरी आटोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शुद्ध राजकीय हेतूंनी प्रेरित होऊन परंपरेच्या नावाखाली या सणांना आलेले बीभत्स स्वरूप क्लेशकारक आहे. यामध्ये संस्कृती आणि परंपरा जपण्याचा वारंवार केलेला दावा किती फोल आहे हे नव्याने सांगण्याची गरजच नाही. सणांचा 'खेळ'खंडोबा तर यांनी केलाच, पण परंपरागत मल्लखांब किंवा मातीवरील कुस्ती अशा साहसी खेळांकडे मात्र यांना अजिबात लक्ष द्यावेसे वाटत नाही. कारण स्पष्ट आहे की या खेळांमध्ये धांगडधिंगा फारसा करता येणार नाही आणि खेळाडूंना कमीतकमी प्रशिक्षण घ्यावे लागेल. अमरावतीच्या हनुमान व्यायामशाळेने मात्र या परंपरागत खेळांचे केलेले जतन आणि संवर्धन हे कौस्तुकास्पद आणि अभिनंदनीय आहे. मराठी संस्कृती आणि इतिहासाचा वारसा असलेल्या आपल्या गड आणि किल्ल्यांची आपण केलेली दुर्दशाही अशीच क्लेशकारक आहे.

सांस्कृतिक बधिरता आलेला समाज अभिरुचिहीन होऊन आपल्या सणांचे आणि परंपरांचे व्यापारीकरण आणि विकृतिकरण करायला लागतो, तर सांस्कृतिक सजगता सामाजिक अभिरुची वाढवते आणि सगळ्याच सांस्कृतिक वारशांचे जतन करू लागते. ग्रंथालये आणि संग्रहालये ही म्हणूनच निर्माण करावी लागतात. दरडोई गाड्यांचा वापर किंवा सल्फ्युरिक ॲसिडची निर्मिती ही देशाच्या उन्नती किंवा संस्कृतीचे मोजमाप न होता, दर माणशी त्या देशामध्ये पुस्तकांची संख्या आणि संग्रहालये किती आहेत हाच सांस्कृतीच्या प्रगतीचा निकष ठरला पाहिजे. परंपरांची खरी जपणूक यामुळेच होणार आहे.

पूर्वी बऱ्याच हस्तलिखितांच्या शेवटी खालील श्लोक लिहीलेला असे.

**जलाद्रक्षेत्तैलाद्रक्षेद्रक्षेच्छिथिलबन्धन।**
**मूर्खहस्ते न मां दद्यादिति वदति पुस्तकम्॥**

त्याचा अर्थ आहे, ''माझे पाणी, तैलपदार्थ आणि सैल बांधणीपासून रक्षण कर तसेच मला मूर्खांच्या स्वाधीन करू नकोस.'' आमची परंपरा, सण आणि संस्कृतीला आता मूर्खांच्या हातात पडू देऊ नका असेच म्हणण्याची पाळी आता सामान्य नागरिकांवर आली आहे.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.